# श्री साईलीला



श्रीबाबांनी महामारीला जात्यात दळली !

D.NEROY

मासिक ]

वर्षारंभ अंक

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥



## श्रीसाई वाक्सुधा

अवश्य येणार येवो मरण ।
परी न हरीचें पडो विस्मरण ।
इंद्रियीं आश्रम वर्णा चरण ।
चित्तें हरि चरण चिंतावे ॥ ८३ ॥

रथ जैसा जुंपल्या हयीं ।
तैसेंच हें शरीर इंद्रियीं ।
मनाच्या दृढ प्रग्रहीं ।
बुद्धि निग्रही निज हस्तें ॥ ८४ ॥

मन संकल्प विकल्प भरीं ।
धांवे यथेष्ट स्वेच्छा विहारी ।
बुद्धि त्या निजनिश्चयें निवारी ।
लगाम आवरी निजसत्ता ॥ ८५ ॥

बुद्धी सारिखा कुशल नेता ।
ऐसा सारथी रथीं असतां ।
रथ स्वामीसी काय चिंता ।
स्वस्थ चित्ता व्यवहरे ॥ ८६ ॥

देहगत सकल कार्य ।
हें बुद्धीचें निजकर्तव्य ।
ऐसी मनासी लागतां संवय ।
सर्व व्यवसाय हितमय ॥ ८७ ॥

—श्रीसाईसच्चरित–अध्याय ३९ वा

# श्रीसाईलीला


[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५९ वे] एप्रिल १९८० [अं. १



: संपादक :

श्री. क. हि. काकरे,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )



वार्षिक वर्गणी रु. १०–०० ( ट. ख. सह )

किरकोळ अंक १ रु. फक्त.



: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४–बी,

डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०० ०१४

दूरध्वनी : ४४ ३३ ६१

# अनुक्रमणिका-एप्रिल १९८०


१) संपादकीय — बाबांचे सरळ साधे-सोपे तत्वज्ञान
२) आध्यात्मिक वृत्तीचे साईभक्त श्री दत्ताबाळ — सदानंद चेंदवणकर
३) आमचे नवे शासकीय मार्गदर्शक न्या. श्री. रत्नपारखी – श्रीसाईनंद
४) मुंबई विश्वस्त कायद्याचे स्वरूप — श्री. क. हि. काकरे
५) क्लेशाचे कारण मनाचा निर्बळपणा — डॉ. के. भ. गव्हाणकर
६) शिरडीच्या बाबांची सर्वगामी व्यापकता — डॉ. रा. सी. कापडी
७) तुका म्हणे साई — डॉ. म. स. बाबरे
८) श्रीसाई मूळ निराकार — डॉ. अनिल जायस्वाल
९) क्षमाशील बाबा — डॉ. सुमती खानविलकर
१०) श्री साईबाबा व त्यांचे शिष्य उपासनी बाबा — श्री. र. शं. जुन्नरकर
११) बाबा! बाबा! मला पक्षी व्हावसं वाटतं हो — सौ. शशिकला रेवणकर
१२) आधुनिक संजीवनी उदी — श्री. व्यंकटराव मुळे
१३) श्री साईकृपेचे दोन अनुभव — श्री. मधुकर मंडलीक
१४) भेटीलागी जीवा लागलीसे आस — श्री. पां. वा. भुतकर
१५) चिंतन! चिंतन! चिंतन! — श्री. सूर्यकांत गर्जे
१६) बाबांचा शामसुंदर, व भोजन दरबार — सौ. उषा मुळे
१७) गोदावरी माताजींचा शुभसंदेश — —
१८) शिरडीवृत्त — फेब्रुवारी १९८०
१९) साई प्रभू — शामा शंकर पराडकर
२०) श्रीसाईंशी प्रार्थना — श्री. अशोक केळकर
२१) माझ्या जीवनाची साथ — डॉ. ग. सं. कामत
२२) साई नाम — श्री. ग. रा. पालकर
२३) शिरडीच्या नाथा — श्री. दशरथ तळेकर
२४) साई पूजा — श्री. राम औसेकर
२५) शिरडी माझे पंढरपूर — श्री. विलास पडवळ
२६) माय माऊली ग साई — सौ. आशा इंगळे
२७) ओम साई नमः — कु. सुधा शिवलकर
२८) साईबाबा सांभाळी — सौ. मालती आगाशे
२९) शिर्डीश्वरा — श्री. बबन धोंडू येरम

# साईबाबांचे सरळ साधे-सोपे तत्त्वज्ञान

महाराष्ट्रभूमी ही जशी प्रतापी, शूर वीरांची आहे तशीच ती संतांचीही भूमी आहे. या भूमीचे पावित्र्य आणि मांगल्य शूर, प्रतापी वीर पुरुषांनी मनगटाच्या जोरावर, तलवारीच्या खणखणाटाने जसे लढाया जिंकून राखले आहे तसेच ते नाना प्रांतात जन्म घेतलेल्या नाना धर्मांच्या, जातींच्या व पंथांच्या संतमहंतांनीही आपल्या अमृततुल्य वाणीतून बाहेर पडलेल्या विचारधनाने राखले आहे.

नदीचे मूळ व ऋषींचे कुळ विचारू नये असे म्हणतात. साईबाबांच्याविषयी असेच म्हटले पाहिजे. कारण साईबाबा यांच्या जातीधर्माविषयी लोकात वाद आहे. कुणी त्यांना हिंदु मानतात, तर कुणी त्यांना मुस्लीम मानतात. पण एक मात्र निर्विवाद आहे की, श्रीसाईबाबा हे थोर संत होऊन गेले आहेत.

दुष्काळी अहमदनगर जिल्ह्यातील शिरडीसारख्या लहानशा गावात साईबाबांनी अलौकिक कार्य केले. वास्तविक शिरडीचा भाग हा वैराण भाग, पण साईबाबांनी आपल्या जीवित कार्याने या भागाचे नंदनवनच बनविले. शिरडी येथे साईबाबा कुठून आणि केव्हा आले हे कळायला मार्ग नाही. पण या भागात येऊन त्यांनी आपले वास्तव्य केले व "जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले। तोची साधु ओळखावा। देव तेथेचि जाणावा ॥" या तुकाराम महाराजांच्या उक्तीला ते सार्थ ठरले. शिरडीतील गरीब, दुबळ्या जनतेला साईबाबांनी आपल्या अमोघ, अमूल्य वाणीचे संजीवन दिले. स्वच्छतेची शिकवण दिली, श्रमाचे धडे दिले. सकाळी उठावे, आवतीभोवतीचा परिसर हातात केरसुणी घेऊन स्वच्छ करावा, ईश्वराचे मनोभावे स्मरण करावे, भजन करावे. नंतर भिक्षा मागावी. भिक्षेत जे दाणे मिळतील ते स्वतः दळावेत, त्यांची खिचडी स्वतःच तयार करावी आणि स्वतः खाता-खाता प्रसाद म्हणून इतरानाही वाटावी असा साईबाबांचा दिनक्रम होता. बाबांच्या या दिनक्रमांचा भोळ्याभाबड्या गरीब जनतेवर मोठा प्रभाव पडला व सारी जनता बाबांच्या या दिनक्रमांचे अनुकरण करू लागली. लोकांची घरेदारे, अवती-भोवतीचा परीसर, इतकेच काय, पण सबंध शिरडी देखील स्वच्छतेचे माहेरघर बनली. लोकांना नकळत श्रमाची शिकवण मिळाली. स्वावलंबनाची शिकवण मिळाली. बाबांनी अनेक ठिकाणी झाडे लाविली. स्वतःच्या वास्तव्याच्या ठिकाणी सुंदरशी बाग निर्माण केली. लोकांनी सुद्धा आपल्या घराच्या अवती-भोवती बागा निर्माण केल्या. त्यामुळे शिरडीतील रोगराई दूर पळाली. लोकांच्या स्वकष्टाने दुष्काळही हटला.

साईबाबांनी गरीब—श्रीमंत यांना जवळ केले. कुणी मोठा नाही, कुणी छोटा नाही. सारी परमेश्वरांची लेकरे आहोत. सर्वांनी प्रेमाने, सहकार्याने वागले पाहिजे अशी शिकवण दिली. जाती-जमातींतील वैरभाव सर्व धर्मांच्या, पंथांच्या, जातींच्या लोकांना जवळ करून त्यांनी नष्ट केला. वर्णभेद व वर्गभेद त्यामुळे मिटले गेले. सर्वात समभाव आपोआपच निर्माण झाला. समतेची महान शिकवण मानवतेची सेवा करातकाचरत साईबाबा देऊन गेले.

आपल्या दरबाराजवळ साईबाबांनी तुळस व सबजा शेजारी-शेजारी लाविला. ते मंदिरातही जात व मशिदीमध्येही जात. त्यांच्या या कृतीने धार्मिक एकता निर्माण झाली. राम-रहीम जवळ आले. एक उदाहरण देतो. शिर्डी येथील साईबाबांच्या समाधीपाशी कडूलिंबाचे एक झाड आहे. त्या झाडाचा पाला साखरेसारखा गोड लागतो. त्याचा रस दुधासारखा निघतो. आपल्या सर्व समदृष्टीने साईबाबांनी त्या झाडाच्या प्रतीकाने समाजातील कटुता घालवून समाजात गोडी निर्माण करता येते हे पटवून दिले.

पशुपक्ष्यांशी व प्राणिमात्रांशी बाबा एकरूप झाले होते. ' जनावरांवर प्रेम करा त्यावर दया करा. त्यांची सेवा करा. ' असे बाबा नेहमीच सांगत असत. कुत्री, मांजरे, गाई, वासरे यांच्याविषयी बाबांना अतिशय प्रेम वाटे. त्यांच्या संगतीत ते नेहमीच रमत असत. याला कारण त्यांच्या मानसिक शक्तीचा विकास! ज्यांच्या मानसिक शक्तीचा विकास होतो तीच माणसे समाजकल्याण साधू शकतात.

' जो माझ्याकडे ज्या दृष्टिकोनातून पाहील तसे त्याला फळ मिळेल ' असे बाबांनी एके ठिकाणी म्हटले आहे. याचा अर्थ असा नव्हे की लोकांनी विभूतीपूजक बनून बाबांच्या भजनी लागावे. याचा अर्थ अगदी सोपा आहे आणि तो असा की, तुम्ही कुणाकडेही सद्भावनेने पहा. सद्विचाराने जा. तुमचे भले होईल. ' जशी दृष्टी तशी सृष्टी ' या म्हणण्याप्रमाणे शुद्धाचरणाने स्वतःचे हित ज्याला त्याला करून घेता येते.

गरीब-श्रीमंत यांनी भेदभाव विसरून एकत्र यावे. ब्राह्मण शूद्र यांनी एकाच पंक्तीला बसावे. स्वकष्टाने मिळवावे. स्वतःबरोबर त्याचा इतरानाही लाभ घेऊ द्यावा, प्राणिमात्रावर दया करावी, प्रेम करावे, स्वच्छतेचे व्रत घ्यावे. वृक्षवेली लावाव्यात, वाढवाव्यात. हिंदु-मुस्लीम, शिख पारशी असे धर्मभेद मानू नयेत. सऱ्यांनी समतेने वागावे. मानवाने मानवाचीच सेवा करावी, सर्वाभूती समभाव ठेवावा. विभूतीपूजा करू नये अशी अगदी साधी व सोपी शिकवण साईबाबांनी आपल्या वागणुकीने लोकाना दिली. लोकांनाही त्यांचा साधा सरळ उपदेश पटला व त्यांनी आचरणात आणला. ' साईबाबा ' या शब्दात स + आई असे शब्द आहेत. आई-सह असलेले बाबा ते साईबाबा! साईबाबांनी मातृपितृप्रेमानेच गरीब दुबळ्या लोकांना जवळ केले. त्यांच्या समस्या सोडविल्या. त्यांना दिलासा दिला. दिव्यप्रेम, शक्ति, अर्थात करुणा त्यांनी महाराष्ट्रभूमीत साकार केली. पंथ, धर्म, जात आचार या सारख्या या युगाला न मानवणाऱ्या भेदभावांना व कर्मकांडाला दूर करून श्रद्धा, निष्ठा आणि शरणांगतीच्या मार्गांनी साईबाबांनी सऱ्यांच्या जीवनास सहजतेने स्पर्श केला. म्हणूनच—

शिरडीमें संत साईनाथ की होती है आरती। गाते है सब भारती। हिंदु, मुसलमान, पारशी सर्व जातीचे धर्म, पंथाचे लोक एक दिलाने, भक्तिभावाने साईबाबांची शिकवण आचरणात आणून त्यांची आरती सतत गात राहाणार आहेत.

वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन—

# साईभक्त तत्वचिंतक

## प. पू. श्री. दत्ता बाळ



**सदानंद चेंदवणकर**

कार्यकारी संपादक श्रीसाईलीला

● भारतातील एक थोर तत्वचिंतक आणि आध्यात्मिक विचारवंत म्हणून प. पू. श्री दत्ताबाळ यांना आज जग ओळखत आहे. ते कोल्हापूरचे आहेत. त्याचं खरंखुरं आडनाव देसाई. त्यांचे वडील कोल्हापूरचे एक ख्यातनाम शिक्षणशास्त्रज्ञ, 'एम. आर. देसाई' या नावानं त्यांना उभा महाराष्ट्र ओळखतो. ते एम. एड. (लंडन) असून एक अतिशय बुद्धीमान व्यक्ती म्हणून करवीर नगरीत प्रसिद्ध आहेत. दत्ता बाळ यांच्या मातोश्रींचे नाव सौ. सुशिलाबाई. दत्ताबाळ हे एम. आरांचे द्वितीय चिरंजीव. त्यांचा जन्म ७ एप्रिल १९४१ रोजी कोल्हापूर येथे झाला. अगदी योगायोगाची गोष्ट याच दिवशी एम. आर. यांचे एक प्रियमित्र श्री. दत्ताजीराव पाटील हे महायुद्धात कामास आल्याची तार आली तेव्हा आपल्या या आजच जन्मास आलेल्या मुलाचं नाव 'दत्ता' ठेवायचे हे त्यांनी ठरवून टाकलं व त्या नावाच्या पुढं 'बाळपणाची झालर मिळाली व 'दत्ताबाळ' हे जे नाव रुढ झालं ते आता कायमचेच.

श्री दत्ता बाळ यांचं लहानपण कागलला गेलं व तिथेच ते शिकले. पण लहानपणापासूनच त्यांची वृत्ती निराळी, त्यांचे सवंगडी पण निराळे. आकाश, तारका, सुर्य, झाड, फुलं, हिरवळ, चंद्र या साऱ्या निसर्ग सौंदर्याने बाळ वयातच त्यांच्यातलं

काव्य, कलात्मकता, भावोत्कटता व आध्यात्मिक प्रतिभा जागी झाली. विवेकानंद, रामकृष्ण परमहंस, रामतीर्थ, येशूख्रिस्त इ. महापुरुषांची चरित्र त्यांनी आत्मसात केली. १९५७ ते १९६० हा त्यांचा साधना काल होता.

तो पूर्ण झाल्यावर १९-१०-१९६१ रोजी विजयादशमीच्या मुहूर्तावर श्रीदत्त-बाळ मिशन डिव्हाईन या त्यांच्या आध्यात्मिक संघटनेची संस्थापना झाली. १६-७-१९६२ रोजी गुरुपौर्णिमेच्या आदल्या दिवशी ते सखोल चिंतनात होते व तशा अवस्थेतच त्यांना महान दर्शन लाभले, भगवंतांचा साक्षात्कार त्यांना झाला. हा साक्षात्कार अद्वितीय रूपात झाला हा त्यांच्या आयुष्यातला सर्वांत मोलाचा दिवस होय.

पुढे आपल्या मिशन तर्फे त्यांचे व्याख्यानाचे गतिमान दौरे सुरू झाले. सामाजिक जाणीव व्यापक प्रमाणात घडविण्यासाठी ते यत्न करू लागले. ठिकठिकाणी त्यांची व्याख्याने गाजू लागली. आचार्य अत्र्यांनी त्याचमुळे त्यांच्यावर अविरत प्रेम केले.

श्रीदत्ताबाळ यांच्या एकंदर सुकिर्तीमुळेच की काय जपानच्या जागतिक धर्म आणि शांतता परिषदेत त्यांना सन्मानाने निमंत्रण देण्यात आलं होतं तिथे ते हजर राहिले, व्याख्यान पण दिलं. त्या व्याख्यानानंतर त्यांचा खूपच बोलबाला झाला व लंडनमधील जागतिक-आध्यात्मिक-संस्थेच्या संस्थापिका श्रीमती बॅस्बी व अमेरिकेच्या वॉशिंग्टन येथील आध्यात्मिक संस्थेच्या प्रमुख श्रीमती हॉलिस्टर यांनी त्यांचं अभिनंदन केलं. स्वामी विवेकानंदाना ३० व्या वर्षी अमेरिकेंत जागतिक धर्म परिषदेवर व्याख्यानासाठी निमंत्रित करण्यात आलं होतं व श्रीदत्ता बाळना पण वयाच्या ३० व्या वर्षीच जपानला जागतिक धर्म आणि शांतता परिषदेसाठी निमंत्रित केलं गेलं ही गोष्ट विशेष लक्षात ठेवण्यासारखी आहे. डॉ. कॅमेरा, डॉ. ओकावा, श्रीॲबरनॅथि ही विश्वविख्यात मंडळी परिषदेस हजर होती. जपानच्या जागतिक धर्म परिषदेनंतर श्रीबाळना अनेक ठिकाणाहून, महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यातून व्याख्यानाची आमंत्रणे आली. अखिल भारतीय अय्यप्पा सेवा संघाच्या रौप्य महोत्सवाचे उद्घाटक म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. या परिषदेनंतर त्यांचे असंख्य सत्कार समारंभ झाले व भारताच्या कोनाकोपऱ्यातून व्याख्यानाची त्यांना निमंत्रण येऊ लागली ती त्यांनी स्वीकारली.

श्रीदत्ता बाळना कोणत्याही प्रकारचा रूढीवाद मंजूर नाही तसेच त्यांना रोगट यतिवादही मान्य नाही, की भोगवादही मान्य नाही. मूलग्राही सौंदर्यदृष्टी, अतितरल संवेदनक्षम व सत्यपूर्ण मार्गाचे दर्शन हे त्यांच्या दैनंदिन जीवनातला गाभा आहे.

अत्याधुनेक विज्ञानापासून वाङ्मयातील सर्व प्रकारांचे सातत्याने ते वाचन करतात. त्यांचे पाशी काही दैवी शक्ती नाही. किंवा योग सामर्थ्यही नाही. परमेश्वराच्या अस्तित्वाची त्यांना पूर्ण जाणीव आहे. ते दिव्य प्रेमाचे तत्वज्ञान केवळ शब्दातून सांगत नाहीत तर त्यांच्या प्रत्येक शब्दात तीव्र प्रक्षेपण क्षमता असते. सर्व संतांच्या बद्दल त्यांना अत्यादर आहे. बहुतेक सर्व संतांच्या कर्मभूमीला त्यांनी भेट देऊन त्या त्या संताचा त्यांनी आदर गौरव केलेला आहे. शिरडीला सुद्धा त्यांनी येऊन श्रीसाईबाबांच अत्यादर पूर्वक गौरव केलेला आहे.

आध्यात्माप्रमाणेच श्रीदत्ताबाळना संगीत, नृत्य व चित्रकला या चांगल्याच अवगत असून त्यावर ते अधिकारवाणीने बोलू पण शकतात. आज उभा महाराष्ट्र त्यांना कलावंत, कवी, योगी व श्रेष्ठ विचारवंत तत्वज्ञ या विशेषणांनी ओळखतो आहे. अशा या थोर वंदनीय विभूतीला त्यांच्या वाढदिवस प्रसंगी शुभेच्छा.

❀ ❀ ❀

साईभक्तांना विनंती

## नोटा पाकीटातून पाठवू नकात

अनेक साईभक्त संस्थानला देणगी पाठविण्याचे इच्छेने चलनी नोटा साध्या पाकिटातून पाठवितात असे बऱ्याच वेळा निदर्शनास येत आहे. अशा वेळी त्यांनी पाठविलेल्या नोटा संस्थानपर्यंत पोहोचत नाहीत, व पाकिट सुद्धा फाटलेल्या अवस्थेत मिळते. चलनी नोटा पोस्टाने पाकिटातून पाठविणेस कायद्याने तर प्रतिबंध आहेच परंतु अशी रक्कम वाटेतच गायब होत असलेने भक्तांनी मोठ्या श्रद्धेने पाठविलेले पैसे त्यांचे इच्छेप्रमाणे सदुपयोगाकरिता मिळू शकत नाहीत.

तरी ज्या भक्तांना असे देणगी रूपाने पैसे पाठविण्याची इच्छा असेल त्यांनी कृपया कोर्ट रिसीव्हर यांचे नावाने कोणत्याही बँकेवरील क्रॉसड व अकौन्ट पेयी डिमांड ड्राफ्ट वा चेक अथवा मनीऑर्डर वा पोस्टल ऑर्डरने पाठवावेत ही विनंती.

—क. हि. काकरे
न्यायालय धारक,
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी

# न्यायमूर्ती श्री. मधुकरराव रत्नपारखी यांचे स्वागत

—श्री. साईनंद

● श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचा कारभार इ. सन १९६० सालापासून सिटी सिव्हिल कोर्ट, मुंबई यांचे मार्फत चालू आहे. सिटी सिव्हिल कोर्टाचे न्यायमूर्ती यांचे मार्गदर्शनाखाली संस्थानचे कोर्ट रिसिव्हर आजतागायत काम पहात आहेत. १९६८ सालापासून १९७९ सालअखेर सिटी सिव्हिल कोर्टाचे लोकप्रिय न्यायमूर्ती श्री. एन. के. पारेख श्रीसाईबाबा संस्थानच्या कारभाराकडे जातीने लक्ष देऊन वेळोवेळी सल्ला व मार्गदर्शन कोर्ट रिसिव्हर साहेबांना देत होते पण आता त्यांची नेमणूक मुंबई उच्च न्यायालयात झाल्याने त्यांचे जागी न्या. श्री. मधुकर सदाशिव रत्नपारखी यांची नेमणूक करण्यात आली व ओघानेच त्यांचेकडे संस्थानचे कामकाज पण आले आहे.

श्री. मधुकरराव मूळ विदर्भातले. त्यांचा जन्म अमरावतीजवळच्या धामणगाव कसब्यातील झामोरी या छोट्याशा गावी झाला. त्यांचे वडील श्री. सदाशिवराव हे सुखवस्तू व आपली शेतीवाडी तिथे बघत असत. १९७५ साली ते निधन पावले. मधुकररावांच्या मातोश्रींचे नाव कृष्णाबाई त्या मात्र हयात आहेत. मधुकररावांचे प्रा. शिक्षण झामोरी येथेच झाले. पुढील दुय्यम शिक्षण तळेगाव खारच्या ए. व्ही. हायस्कूलमधून झाले. १९४४ साली ते वरूडच्या हायस्कूलमधून चांगल्या गुणांनी मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाले. उच्च शिक्षणासाठी त्यांनी अमरावतीच्या किंग एडवर्ड कॉलेजात (हल्लीचे विदर्भ महाविद्यालय) नाव दाखल केले व १९४८ साली ते बी. ए पदवीधर झाले. वकील होण्याची त्यांची इच्छा व त्यासाठी त्यांनी अमरावतीच्या शिवाजी लॉ कॉलेजात वकीलीच्या अभ्यासास सुरवात केली व त्या जोडीला एम. ए.चाही अभ्यास स्वतंत्रपणे केला व १९५० साली त्यांनी एम. ए. व एल.एल. बी. अशा दोन्ही परीक्षा देऊन सुयश मिळविले. एम.ए.ला तर ते सबंध विद्यापीठात दुसरे आले.

या नेत्रदिपक यशाचा परिणाम असा झाला की यवतमाळच्या महाविद्यालयात अर्थशास्त्र या विषयाचे प्राध्यापक म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली १९५२ अखेर ते तिथे त्या पदावर होते. पुढे १९५३ साली त्यांनी अमरावतीसच आपली वकीली सुरू केली खरी पण याचवेळी ज्युडिशियल सर्व्हिसमध्ये आपले जीवन गुंतवावे असे त्यांना वाटले व त्या क्षेत्रात त्यांनी शिरकाव केला. यानिमित्याने त्यांनी अकोला येथे पहिली नोकरी केली. पुढे मेहेकर, बुलढाणा, भंडारा, वाशिम, शिरपूर

धुळे, नागपूर इ. ठिकाणी त्यांच्या बदल्या होत गेल्या व बराच अनुभव त्यांच्या जमेला आला. असिस्टंट जज्ज म्हणून त्यांनी अकोला येथे प्रथम कामकाज पाहिले. त्यानंतर नांदेड, जळगाव येथेही त्यांच्या या पदासाठी नेमणूका करण्यात आल्या. १९७४ साली ते प्रथम मुंबईला आले. येथल्या कायदे खात्यात "सॉलिसिटर फॉर दि गव्हरमेंट ऑफ महाराष्ट्र" अशी त्यांची जबाबदारीची नेमणूक करण्यात आली खरी पण त्याच वर्षाच्या अखेरीस बुलढाणा येथे त्यांची सेशन जज्ज म्हणून नेमणूक करण्यात आली. १९७६ साली ते पुन्हा मुंबईला आले तेव्हा त्यांची नेमणूक 'डेप्युटी सेक्रेटरी टू दि लॉ डिपार्टमेंट' या पदासाठी करण्यात आली होती. १९७८ साली त्यांची नेमणूक महाराष्ट्र राज्याच्या कायदा खात्याचे संयुक्त सचिव म्हणून करण्यात आली. १९७९ मध्ये त्यांना बढती मिळून ते सिटी सिव्हिल कोर्टात आले व न्या. पारेख साहेब वरीष्ठ न्यायालयाकडे जाताच त्यांचे जागी त्यांची न्यायमूर्ती म्हणून नेमणूक करण्यात आली. हे पद भूषविणाऱ्या न्यायमूर्तींना श्रीसाईबाबा संस्थानच्या कारभारावर देखरेख करण्याचेही काम सांभाळावे लागते यास अनुसरून संस्थानच्या सर्वच गोष्टीकडे त्यांना लक्ष पुरवावे लागणार आहे.

श्री मधुकरराव स्वतः श्रीसाईभक्त आहेत. वेळेच्या अभावी म्हणा किंवा कार्य बाहुल्यामुळे म्हणा शिरडीला ते अद्यापही आलेले नसले तरी श्रीबाबांनी आपल्या या भक्ताला आपल्याकडे ओढून आणले आहे खास! हे विसरता येणार नाही. श्री. मधुकररावांचा विवाह १९५४ साली झाला. त्यांच्या पत्नी या पूर्वाश्रमीच्या कु. सरल सबनीस त्या अकोल्याच्याच श्री. रत्नपारखी दंपतीला २ पुत्र व १ कन्या आहेत. मोठे चिरंजीव श्री. शेखर बी. फार्मडची परीक्षा उत्तीर्ण झाले असून धाकटे चि. शैलेश यंदा दहावीच्या परीक्षेस बसले आहेत. तर कन्या बी. ए. पदवीधर असून ती सौ. रंजना ऋषी म्हणून ओळखली जाते. श्री. मधुकररावांनी प्रवास फार कमी केला आहे. वाचन करणे त्यांना आवडते पण विषय मात्र आध्यात्मिक किंवा तत्व-ज्ञानात्मक असे असावे लागतात. ललित वाचन करणेही त्यांना आवडते. आपल्या फावल्यावेळात गप्पा मारण्याचा त्यांना छंद आहे. गप्पातून गप्पा व त्याही विविध विषयांवरच्या मग काय ते त्यात खूपच रंगतात आणि किती वेळ त्यात गेला याचे त्यांनाही भान मग अजिबात रहात नाही.

न्या. श्री. मधुकरराव रत्नपारखी साहेब याच महिन्यात आपल्या नव्या अधिकार पदावर रुजू होत आहेत; म्हणून श्रीसाईबाबा संस्थानतर्फे त्यांचे स्वागत करतो व संस्थानच्या चालू असलेल्या विकास कार्यात अधिकाधिक लक्ष घालून श्रीसाईभक्तांची व पर्यायाने श्रीसाईबाबांची सेवा करण्याचा सुश्री लाभ त्यांना घडो हीच श्रीसाईशांचे चरणी प्रार्थना.

# मुंबई विश्वस्त कायद्याचे स्वरूप

—श्री. क. हि. काकरे

कोर्टरिसिव्हर श्री साईबाबा संस्थान, शिरडी

● ठिक ठिकाणी साई सेवा मंडळे किंवा तत्सम नवीन नवीन संस्था स्थापन झाल्या आहेत किंवा होत आहेत अशा संस्था चालकांना त्या संबंधी महाराष्ट्र राज्यात लागू असलेल्या कायद्याचे ज्ञान असणेची जरूर आहे म्हणून हा लेख प्रपंच.

मुंबई विश्वस्त कायदा १९५० हा हल्ली असलेल्या महाराष्ट्र राज्यातील पश्चिमेकडील १३ जिल्ह्यात १९५० साली अमलात आला आणि १९५६ सालच्या राज्य पुनर्रचने नंतर मराठवाड्याचे ५ जिल्हे व विदर्भाचे ८ जिल्हे जे महाराष्ट्र राज्यात समाविष्ट करण्यात आले त्यांनाही लागू करण्यात आला. सार्वजनिक धार्मिक व सार्वजनिक परोपकारी न्यासांचा (संस्थांचा) कारभार व्यवस्थित चालावा म्हणून अशा संस्थांच्या कारभारांची देखभाल करता यावी हा हा कायदा करण्यामागील शासनाचा उद्देश.

ह्या कायद्यातील तरतुदी नीट समजण्या करिता "न्यास" म्हणजे काय? तसेच सार्वजनिक न्यास म्हणजे काय? हे समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. न्यास ह्या शब्दाची व्याख्या मुंबई विश्वस्त कायद्यात केलेली नाही. परंतु ह्या कायद्याच्या कलम २ (१३) मध्ये "सार्वजनिक न्यासते" (पब्लीक ट्रस्ट) ह्या संज्ञेची व्याख्या करताना म्हटले आहे—पब्लीक ट्रस्ट म्हणजे सार्वजनिक धार्मिक किंवा सार्वजनिक परोपकारी कारणा करिता किंवा दोन्ही कारणा करिता असलेला व्यक्त किंवा अव्यक्त (Constructive) ट्रस्ट. ज्यात मठ, मंदिर, ववफ, चर्च, अग्यारी किंवा इतर प्रकारचे सार्वजनिक आराधना स्थान, धर्मादाय किंवा इतर धार्मिक किंवा परोपकार स्वरूपाची देणगी आणि तसेच सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० च्या कायद्या प्रमाणे रजिस्टर झालेली धार्मिक किंवा परोपकारी किंवा दोन्ही प्रकारची संस्था येतात एवढेच सांगितले आहे. परंतु ट्रस्ट ह्या शब्दाचा अर्थ सांगितला नाही. ट्रस्ट ह्या शब्दाचा सर्व साधारण अर्थ आहे विश्वास आणि ट्रस्टी ह्या शब्दाचा अर्थ आहे अशी व्यक्ति जिच्यावर दुसऱ्याच्या फायद्याकरिता संपत्तिचा उपयोग करील असा भरवसा टाकून दुसऱ्याच्या संपत्तीची मालकी तात्पुरती दिली जाते. ती व्यक्ती खऱ्या अर्थाने त्या संपत्तीची मालक होत नाही. तिचा दर्जा केवळ रक्षकाचा असतो. अशी संपति त्या व्यक्तिला स्वतःच्या फायद्याकरिता वापरता येत नाही. त्या व्यक्तिच्या ताब्यात अशी संपत्ति देणाऱ्या व्यक्तिच्या इच्छे प्रमाणेच त्या संपत्तिचा उपयोग अन्य लोकांच्याच फायद्याकरिता करायचा असतो.

ट्रस्टस दोन प्रकारचे – १) व्यक्त आणि २) अव्यक्त असतात. व्यक्त ट्रस्ट तोंडी किंवा लेखी समजून उमजून मुद्दाम निर्माण केले जातात. अव्यक्त ट्रस्ट मात्र मुद्दाम निर्माण केलेले नसतात परंतु परिस्थितीच ती संपत्ति ट्रस्ट असल्याचे सिद्ध करते. अव्यक्त ट्रस्टचे उदाहरण द्यायचे तर ते रामायणातले देता येईल. अयोध्येचा राजा दशरथ यांच्या ४ पुत्रांपैकी प्रभु रामचंद्र हे सर्वात वडील पुत्र होते. धर्म शास्त्राच्या संकेता प्रमाणे राजा दशरथा नंतर त्यांचे उत्तराधिकारी म्हणून राजा बनण्याचा अधिकार प्रभु रामचंद्राचाच होता. त्याप्रमाणे त्यांचा राज्यारोहण समारंभ सोहळा चाललाही होता परंतु कर्मगति निराळीच होती. राजा दशरथाने राणी कैकयीला दिलेल्या वराच्या पूर्तिकरिता प्रभु-रामचंद्राना राज्यपद मिळण्याऐवजी १४ वर्षे वनवास भोगावा लागला. कैकयीच्या इच्छेप्रमाणे तिचा पुत्र भरत यांस राजा करायचे ठरले होते. भरत हा दशरथाचा तृतीय पुत्र असल्यामुळे धर्मशास्त्राप्रमाणे त्याला राजा बनण्याचा अधिकार नव्हता. ह्या परिस्थितीची भरतालाही पूर्ण जाणीव होती. त्याचे रामचंद्राविषयी असलेले बंधुप्रेम अद्वितीय होते म्हणून भरताने राजा बनण्याचे स्पष्टपणे नाकारले. त्यांने वनात जाऊन रामचंद्रांना विनविले की त्यांनी अयोध्येला परत येऊन आपले राज्य सांभाळावे परंतु त्याला निराश परतावे लागले. परत आल्यावर त्याने सिंहासनावर प्रभु रामचंद्राच्या पादुका स्थापून रामचंद्रांच्या वतीने राज्यकारभार एक विश्वस्त या नात्याने केला आणि प्रभु रामचंद्र वनवासातून परत आल्यावर राज्य कारभार त्यांच्या स्वाधीन केला. अव्यक्त ट्रस्टचे हे एक उत्तम उदाहरण म्हणता येईल.

विश्वस्त भावना ही फार पुरातन काळापासून चालत आली आहे. पूर्वी लोकांतील निती कल्पना फार उच्च होत्या म्हणून ट्रस्ट आणि ट्रस्टींच्या कारभारावर देखरेख ठेवण्याची गरज नव्हती. कालौघात लोकांच्या मनातील नीति भावना बदलत गेल्या आणि म्हणूनच ट्रस्टींच्या कारभारावर देखरेख ठेवणे आवश्यक झाले. त्या आवश्यकतेतूनच मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा १९५० चा जन्म झाला.

हा कायदा फक्त सार्वजनिक ट्रस्ट पुरताच मर्यादीत आहे. ह्या कायद्याचे सामान्य ट्रस्टींच्या माहितीकरिता स्थूल मानाने ३ भागात विभाजनकरता येईल. १) सार्वजनिक ट्रस्टची स्थापना व कारभार. २) ट्रस्टची संपत्ति व तिची व्यवस्था ३) धर्मदाय खाते.

## १) सार्वजनिक ट्रस्टची स्थापना व कारभार.

सार्वजनिक ट्रस्ट स्थापण्यासाठी संपत्ति आणि ट्रस्टी असणे अत्यंत आवश्यक आहे. ह्या दोहोपैकी एक जरी नसले तर ट्रस्ट होऊ शकत नाही. संपत्तिच नसेल तर

भरवसा कोण्या गोष्टीचा आणि ट्रस्टीच नसेल तर भरवसा तरी कुणावर टाकायचा. ट्रस्ट होण्यासाठी संपत्ति कमीत कमी किंवा जास्तीत जास्त किती असावी यावर कुठलेहि निर्बंध नाहीत. तसेच ट्रस्टींची कमीत कमी किंवा जास्तीत जास्त संख्या किती असावी यावरही निर्बंध नाहीत.

सार्वजनिक ट्रस्ट अस्तित्वात आल्यापासून ९० दिवसाचे आत त्याच्या रजिस्ट्रेशनकरिता ह्या कायद्याच्या कलम १८ प्रमाणे ट्रस्टींना अधिकार असलेल्या सहायक उप-धर्मादाय आयुक्तांकडे विहित नमुन्याचा अर्ज आवश्यक ती माहिती भरून द्यायची असते. ट्रस्टी अर्ज देण्यास चुकल्यास धर्मादाय इन्स्पेक्टरदेखील आवश्यक ती चौकशी करून असा अर्ज करू शकतो. कलम १९ प्रमाणे चौकशी होऊस ट्रस्टची नोंदणी कलम १७ प्रमाणे ठेवलेल्या ट्रस्ट रजिष्टरमध्ये होते व नोंदणीचे सर्टिफिकेट ट्रस्टीला दिले जाते. ट्रस्टच्या दस्तैवजातील तरतुदीनुसार ट्रस्टच्या उद्देश पूर्तिसाठी ट्रस्टचा कारभार चालतो.

ट्रस्टची नोंदणी झाल्यानंतर ट्रस्टची संपत्ति, ट्रस्टी, ट्रस्टचे उद्देश, किंवा ट्रस्ट संबंधी इतर बाबी ज्यांची नोंदनी पब्लीक ट्रस्ट रजिस्टर मध्ये झालेली आहे त्यामध्ये जेव्हा केव्हा फेरबदल होतो तो बदल बदलल्या तारखेपासून ३० दिवसाचे आत ट्रस्टीनी कलम २२ प्रमाणे विहित नमुन्याचा अर्ज देऊन सहायक उप धर्मादाय आयुक्ताना कळवायला पाहिजे. ट्रस्टी तसे करण्यास चुकल्यास त्यावर खटला चालून तो शिक्षेस पात्र होतो.

## २) ट्रस्टची संपत्ति व तिची व्यवस्था

ट्रस्टची सर्व संपत्ति ट्रस्टीच्या स्वाधीन असते. शहाणा माणूस आपल्या स्वतःच्या इस्टेटीची जेवढी काळजी घेतो किमान तेवढी काळजी ट्रस्टीने आपल्या स्वाधीन असलेल्या ट्रस्टच्या संपत्तिची घ्यायला पाहिजे. त्या करिता ट्रस्टचे आर्थिक वर्ष सुरू होण्यापूर्वी त्याने आगामी वर्षासाठी ट्रस्टच्या उत्पन्न व खर्चाचे अंदाज पत्रक तयार करून कलम ३१ अ प्रमाणे सहायक उप धर्मादाय आयुक्ताच्या कचेरीत दाखल केले पाहिजे. ट्रस्टच्या उत्पन्न व खर्चाचे हिशेब त्याने लिहून ठेवायला पाहिजे. ते हिशेब तपासनीसा कडून दर वर्षी तपासून घेऊन हिशेब तपासणेचे तक्ते सहायक उप धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयात दाखल केले पाहिजेत. तसे करण्यास चुकणे हा कायद्याने गुन्हा होऊन चुकणारा ट्रस्टी शिक्षेस पात्र सम ठरतो.

प्रत्येक ट्रस्टचे आपले स्वतःचे उद्देश असतात आणि त्या उद्देशांच्या पूर्ति करिता त्या त्या ट्रस्टचे काम चालते. त्या उद्देश पूर्ति करिता लागणारा खर्च, त्या त्या ट्रस्टच्या फंडातील पैशातून मागविला जातो. काही वेळा धार्मिक किंवा सामा-

जीक कार्यकर्त्यांना सार्वजनिक समाजोपयोगी काही धार्मिक किंवा परोपकार स्वरूपाचे कार्यक्रम हाती घेण्याची इच्छा होते. असले कार्यक्रम हाती घ्यायचे म्हणजे पैसा पाहिजे. ही माणसे कुठल्याही ट्रस्टचे ट्रस्टी नसतात किंवा त्यांच्याकडे सार्वजनिक पैसा ही नसतो. तेव्हा फंड उभारून जनतेकडून पैसा गोळा करणे क्रमप्राप्त होते. उदाहरणार्थ सार्वजनिक गणेश उत्सव, दसऱ्याच्या वेळी पूजा उत्सव, दुष्काळ निवारण वादळ किंवा पूरग्रस्त लोकांचे पुनर्वसन इ. ह्या सर्व कार्याकरिता जनतेकडून पैसा जमविणे अनिवार्य असते. अशा वेळी पैसा जमवण्यांसाठी ज्या समित्या नेमल्या जातात त्यांनी कलम ४१ क प्रमाणे सहाय्यक उप धर्मादाय आयुक्ताकडे अर्ज करून ह्या कार्याकरिता पैसे गोळा करण्याकरिता परवानगी घेणे आवश्यक असते. अशा रितीने गोळा होणाऱ्या पैशाचे हिशेब ठेऊन आणि कायद्याने ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा जास्त पैसे गोळा झाले तर ते हिशेब, हिशेब तपासनीसाकडून, तपासून घेऊन हिशेबाचे तक्ते सहायक उप धर्मादाय आयुक्ताच्या कार्यालयात दाखल केले पाहिजेत. खर्च वजा जाता पैसे उरले आणि किंवा असल्या कार्यक्रमाचे स्वरूप कायमचे असेल तर सार्वजनिक ट्रस्ट स्थापून कलम १८ प्रमाणे अर्ज देऊन नोंदवून घ्यायला पाहिजे.

"बहुरुपा वसुंधरा" पृथ्वीतलावर निसर्ग एकेंद्रिय प्राण्यापासून पंचेंद्रिय, प्राणी तसेच माणसे यांचे बाह्यरुप, त्यांचे अंतरंग व मनोवृत्ती यामध्ये वैचित्र्य आढळून येते. तशाच प्रकारचे वैचित्र्य ट्रस्टींच्या मनोवृत्तीतही आढळते. सर्व साधारणपणे ट्रस्टी ट्रस्टचे काम समाज सेवेच्या भावनेने करतात पण असेही ट्रस्टी असतात की जे ट्रस्टची संपत्ती किंवा पैसा आपल्याच मालकीचा आहे असे गृहीत धरून त्याचा अपहार करतात. काही वेळेस ट्रस्टीच्या निष्काळजीपणामुळे ट्रस्टचे आर्थिक नुकसान होते. अपहार किंवा ट्रस्टीच्या निष्काळजीपणामुळे ट्रस्टच्या होणाऱ्या नुकसानीची सहाय्यक उपधर्मादाय आयुक्त कलम ३९ प्रमाणे चौकशी करून आपला अहवाल धर्मादाय आयुक्तांकडे पाठवितात. असे नुकसान सिद्ध झाल्यास धर्मादाय आयुक्त कलम ४० प्रमाणे ट्रस्टीकडून नुकसानीची रक्कम वसूल करण्याचा आदेश देतात.

ट्रस्टच्या शिल्लकी आणि लगेच न लागणाऱ्या पैशाची गुंतवणूक कलम ३५ प्रमाणे रिझर्व बँक ऑफ इंडिया ॲक्ट १९३४ च्या कायद्याप्रमाणे अस्तित्वात आलेली शेडयुल्ड बँक, पोस्टाची बचत बँक, राज्य सरकारने या कामाकरिता मान्य केलेली सरकारी बँक किंवा पब्लीक सिक्युरिटीजमध्येच करायला पाहिजे.

कलम ३६ प्रमाणे धर्मादाय आयुक्तांची पूर्व परवानगी न घेता ट्रस्टच्या स्थावर मिळकती संबंधी केलेले विक्रीचे, मोबदल्याचे किंवा बक्षिसाचे व्यवहार तसेच

भाडेपट्टा शेती संबंधी १० वर्षापेक्षा जास्त काळाचा ट्रस्टच्या मालकीच्या इमारती-संबंधी ३ वर्षापेक्षा जास्त मुदतीचा रद्दबातल असतात. असे व्यवहार करण्यापूर्वी आवश्यक ती माहिती देऊन धर्मादाय आयुक्ताकडे अर्ज करून परवानगी घ्यायला पाहिजे.

## ३) धर्मादाय खाते व त्याचे अधिकारी :—

महाराष्ट्रात ७०,००० पेक्षा नोंदणी झालेले ट्रस्ट आहेत, आणि नवीन ट्रस्टांची देखील नोंदणी अव्याहतपणे चालू आहे. ह्या सर्व ट्रस्टींच्या कारभारावर प्रभावी देखरेख ठेवण्याकरिता महाराष्ट्र सरकारने (Charity Organization) धर्मादाय संघटना स्थापन केली आहे. ह्या संघटनेच्या खर्चाचा भार महाराष्ट्र सरकारच्या तिजोरीवर मुळीच पडत नाही. ह्या संघटनेवर खर्च भागविण्यासाठी कलम ५८ प्रमाणे प्रत्येक ट्रस्टच्या वार्षिक उत्पन्नावर ठरावीक % रक्कम सेवा आकार म्हणून आकारली जाते व ट्रस्टकडून वसूल केली जाते.

ट्रस्टच्या इस्टेटीची व्यवस्था चांगल्या तऱ्हेने होण्याकरिता, तिच्या उत्पन्नाचा हिशेब नीट राहण्याकरिता आणि त्याचा विनियोग ट्रस्टच्या उद्देशाकरिताच आणि ट्रस्ट करिताच होण्याकरिता धर्मादाय आयुक्त, सहायक उप धर्मादाय आयुक्त कलम ४१ अ प्रमाणे ट्रस्टींना किंवा ट्रस्टशी निगडीत असलेल्या व्यक्तिला आवश्यक ते हुकूम देऊ शकतात, आणि ट्रस्टीला किंवा त्या व्यक्तीला त्या हुकूमाचे पालन करावेच लागते.

कलम ४१ ड प्रमाणे धर्मादाय आयुक्ताना खालील कारणामुळे ट्रस्टीला निलंबीत करण्याचा, काढून टाकण्याचा किंवा बडतर्फ करण्याचा अधिकार आहे जर तोः—

१) सतत हिशेब तपासनीचे तक्ते देण्यास चुकत असेल.

२) धर्मादाय आयुक्ताने दिलेल्या कायदेशीर हुकूमाची मुद्दाम अवज्ञा करीत असेल.

३) सतत आपल्या कर्तव्य पालनाकडे दुर्लक्ष करीत असेल किंवा ट्रस्टचा सार्वजनिक विश्वास भंग किंवा विश्वास घात करीत असेल.

४) ज्या ट्रस्ट इस्टेटीचा तो ट्रस्टी आहे तिचा गैर व्यवहार किंवा अपहार करीत असेल.

५) त्याच्या ट्रस्टीपणाला बाध येईल असा त्या ट्रस्ट संबंधी अधिकार ग्रहण करीत असेल.

६) किंवा नैतिक अधःपात असलेल्या गुन्ह्याबद्दल त्याला शिक्षा झालेली असेल.

कायद्यात केलेल्या तरतुदींचा भंग करणे कायद्याप्रमाणे गुन्हा असून भंग करणारा ट्रस्टी शिक्षेस पात्र असतो.

ट्रस्टीला माहीत असणे आवश्यक आहे. तेवढयाच कायद्यातील तरतुदींचा ह्या लेखात समावेश करण्याचा प्रपंच केला आहे. ज्यांना जास्त माहिती पाहिजे त्यांनी बॉम्बे पब्लीक ट्रस्ट ॲक्टच्या पुस्तकाची मदत घ्यावी.

## श्री बाबांच्या भोजन दरबाराचा थाट !

● श्री साईबाबांचे बसण्याचे ठिकाण म्हणजे द्वारकामाई. त्या द्वारकामाईत दुपारी आरतीनंतर जो भोजन दरबार भरावयाचा, त्याचे वर्णन आज आपल्याला त्यावेळी ज्यांनी तो थाट पाहिला त्यांच्याकडून ऐकावयास मिळते. धन्य ते लोक कीं ज्यांनी हा देखावा आपल्या डोळयांनी पाहिला. श्री साईबाबा नैवेदयाचे वाटप आपल्या हातांनी करीत. काही खास भक्त लोक त्यांच्याजवळ बसून भोजन करीत त्यात ( नित्यनियमाचे ) १ ) श्री. काकासाहेब दिक्षीत २ ) बापूसाहेब बुट्टी ३ ) फकीरबाबा ४ ) तात्या पाटील कोते ५ ) बयाजी पाटील ६ ) भागोजी शिंदे ७ ) माधव फसले ८ ) श्री नानासाहेब निमोणकर ९ ) शामराव देशपांडे यांना फक्त खीरच मिळत असे व बाकी सर्व भक्ताना पक्वान्नाचे भोजन मिळत होते. भोजनाकरिता श्रीमंत बुट्टी यांनी एक डझन चांदीची ताटे आणली होती. परंतु ती ताटे भक्ताना द्यावी व आपण स्वतः परळामध्येच भोजन घ्यावे.

असे शुद्ध वैराग्य श्री साईबाबांचे होते.

सौ. उषा मुळे, शिरडी

# क्लेशाचे कारण मनाचा निर्बळपणा

—डॉ. के. भ. गव्हाणकर

इंदिरा निवास, आग्रारोड, कुर्ला, मुं. ७०



● पुण्यात्मा दुःखी दिसतो व पापात्मा सुखी दिसतो याचे कारण मनाचा निर्बळपणा-दुबळेपणा.

सर्व सुखाचे सर्व आनंदाचे आणि सर्व कल्याणाचे कारण परमात्म्यावरील उत्कट प्रेम ते जर जडले नाही, त्याची श्रद्धा डळमळीत असून निश्चयात ढिलेपणा-निर्बळ पणा आहे. हेच दुःखाचे कारण होय. प्रियतेचा कल्लोळ अंगी जागा रहावा. तो नसताना, म्हणजे प्रभू माऊली समोर नसताना, जे जे इंद्रियविषयसुख ते तापदायकच वाटते. आई भेटावी, आईच्या हातून मुरंबा व त्या मुरंब्यातून आईचे प्रेम भेटावे—त्यानिमित्ताने आईच्या मांडीवर आईचे लडिवाळ बोल, कनवाळू निनादाने ऐकत रहावे. हे परमभाग्य आहे. बाळासाठी पान्हावलेल्या गाईप्रमाणे धावत येण्याचे प्रियसुख त्या माउलीलाहि त्या भक्तिसोहळयात भेटते, हे परस्पर प्रेमाचे धागे दुबळे नसतात. मातेचा जिव्हाळा दुबळा नसतो.

आपल्या ठिकाणीच जे प्रभूचे निकटत्व, संरक्षणीय पालनीयत्व आहे त्याच्या स्मरणाने सद्‌गदित झाले पाहिजे. प्रेम हे मूळचेच आहे पण त्याचे आपणास स्मरण नाही. आपली आवड इकडे तिकडे धावत असते. प्रेमळांच्या गोष्टी ऐकताना कल्लोळ येतो पण एकांती निरनिराळ्या संकल्पात रमतो वास्तविक एकांतात प्रभूंचे प्रेम आठवून सारखा जीव झुरून राहिला पाहिजे. अशी झुरणी जीवास लागत नाही. विचाराच्या भिंती आड येतात. हाच मनाचा निर्बळपणा.

पांडव वनवासात असताना, श्रीकृष्ण परमात्मा पांडवांच्या झोपडीत आला. श्रीकृष्णाला पाहून सर्व पांडवांना आनंद झाला. औपचारिक विचारणा झाल्यावर युधीष्ठराने श्रीकृष्णाला विचारले श्रीकृष्णा ! मी सत्याने वागतो, धर्मानी चालतो सर्व व्यवहार करतो व परमेश्वरावर विश्वास ठेवतो, त्याला मानतो मग आम्हांला दुःखावर दुःखे का यावी आणि कौरव, देव, धर्म तर मानत नाही. पण खोटे बोलतात व व्यवहार करतात तर ते आनंदात व सुखात राज्य करत आहेत.

श्रीकृष्ण हसला व म्हणाला, अरे धर्मा! ज्ञान्यास आपल्या स्वरूपात प्रमाद करणे ह्यापेक्षा दुसरे काहीहि अनर्थकारक नाही. कारण प्रमादापासून मोह, मोहापासून अहंवृत्ती व अहंवृत्तिपासून बंध व बंधापासून दुःख होते. व या दुःखाचे कारण निश्चयाचा निर्बळपणा. जर मनुष्य निश्चय करील तर दुःख येत नाही, जेव्हा निश्चयात ढिलेपणा असतो तेव्हाच मनुष्य दुःख भोगतो ही आपली चूक मनुष्य पाहू व समजू शकत नाही. कारण त्यास ती जर दिसत व समजत असेल तर तो दुसऱ्यास दोष द्यावयाचा नाही तर आपल्या दोषाकडेच पाहील त्यावर—

अर्जुन म्हणाला कृष्णा माझ्या निश्चयात तर किंचित्हि ढिलेपणा नाही तरीदेखील माझी सर्वांसारखीच अवस्था आहे. श्रीकृष्ण–' अर्जुना! तुझा निश्चय यतार्थ नसेल, जर असेल तर परमेश्वर कधीही संकट पडू देणार नाही.

अर्जुन म्हणाला माझ्या निश्चयात किंचित्ही कमतरता नाही. आपणास तसे वाटत असल्यास खुशाल वाटू द्या, पण मी तर माझा धर्म यथार्थ पाळला आहे व माझा निश्चय मी कधीच सोडला नाही. श्रीकृष्णाने वाद सोडला. कारण त्याच्याशी वादावादी करण्यात काहीच अर्थ नाही. त्याला पटवूनच दिले पाहिजे.

दुसरे दिवशी अर्जुन व श्रीकृष्ण गंगातीरावर फिरावयास गेले. रस्त्याने बोलत चालत व थट्टामस्करी करीत कृष्ण एकदम एकाएकी अर्जुनास म्हणाला "अर्जुना तुझ्या गळ्यात ही माला आहे ती मला दे"

अर्जुन म्हणाला—कृष्णा ही माला तर माझा जीव की प्राण आहे. प्राण गेला तरी हरकत नाही पण मी ती कोणाला देणार नाही. इंद्राने जेव्हा ही माला मला बक्षीस दिली तेव्हा मला सांगितले की 'तु ही माला कोणास देऊ नको.' त्यामुळे ही माला तर जीवापलीकडे आहे. श्रीकृष्ण म्हणाला—'अर्जुना हा तुझा निश्चय पाहून मला मोठा आनंद होत आहे. पण मित्रा प्राणसंकट येते तेव्हा हा निश्चय रहात नाही. नीती देखील सांगते की जेव्हा संकट येईल तेव्हा द्रव्याच्या योगाने कुटुंबाचे रक्षण करावे व प्राणसंकट येईल तेव्हा कुटुंबाचा त्याग करून प्राणाचे रक्षण करावे. प्राण गेल्यावर ही माला तुला काय उपयोगी आहे? अर्जुन म्हणाला—माझा संपूर्ण निश्चय आहे. वाटेल ते झाले, हवे तसे संकट आले तरीहि ही माला मी सोडणार नाही. माझी ही प्रतिज्ञा आहे की जर ही माला मी सोडीन तर मला परमेश्वराची शपथ आहे."

इतक्यात संध्याकाळ झाली. अर्जुन नित्य नियमाप्रमाणे स्नान संध्येस नदीच्या घाटावर गेला व नदीत स्नानास उतरला. अर्जुन बुडी मारून बाहेर निघाला व आपल्या जागेकडे ज्या ठिकाणी झाडाखाली कपडे ठेवले होते तेथे पाहू लागला, तो तेथे अक्राळ विक्राळ सिंह बसला आहे व अर्जुनाकडे रागाने पहात आहे. अर्जुन घाबरला व त्याने परत नदीत जाऊन बुडी मारली. परत वर आल्यावर पहातो ती सिंह आहेच. त्यानी गळ्यातील माळ काढली आणि सिंहाच्या अंगावर फेकली. सिंह गेला तसा अर्जुन वरती आला. तो श्रीकृष्ण बसला होता तेथे आला व त्याला घडलेली हकीगत सांगितली पण मालेसंबंधी काही बोलला नाही.

ते दोघे ज्या ठिकाणी झाडाखाली अर्जुनाने कपडे ठेवले होते तेथे आले; तो फेकलेली माला अर्जुनाच्या कपड्यावर पडलेली होती. श्रीकृष्णाने ती पाहिली आणि अर्जुनाला विचारले अरे अर्जुना ही तुझ्या गळ्यातील माला इथे आली कशी ! तुझा निश्चय गेला कोठे ? आणि ' देवाची शपथ ' तिचे काय झाले ?

अर्जुनाने मान खाली घातली व म्हणाला असा एकतरी मनुष्य आहे काय ? कृष्ण म्हणाला हो आहे, त्यासाठी आपल्याला ब्राह्मणाचे वेश घेणे प्राप्त आहे.

ते दोघे ब्राम्हणवेशातले कृष्ण अर्जुन एका खेडेगावात माध्यान्ही एका ब्राह्मणाच्या घरी आले, व आम्ही भिक्षूक आहोत आम्हाला भोजन पाहिजे. ब्राह्मणाने त्यांना घरात बोलावले व सर्व काही मिळेल म्हणून सांगितले; इतक्यात श्रीकृष्ण म्हणाला स्वैपाक तुझ्या बायकोनेच केला पाहिजे, त्यावर त्या ब्राह्मणाने आपल्या दोन्ही स्त्रीयाना बोलावले व त्यांना सांगितले की हे दोन्ही ब्राम्हण भिक्षूक आपणांकडे भोजनास आहेत तरी स्नान करून तुम्ही परत स्वैपाक तयार करा.

त्याप्रमाणे त्या दोन्ही स्त्रीयांनी शुचीर्भूत होऊन सोवळ्यात स्वैपाक केला, व अतिथींची पाने मांडली व त्यांना भोजनास बोलावणे केले. ते भिक्षूक आत पाटावर स्थानापन्न झाले आणि त्यांनी विचारले यजमान कुठे आहेत ? त्या स्त्रीयांनी सांगितले की त्यांचे भोजन झाले आहे व ते दुकानात गेले.

भिक्षूक म्हणाले यजमान जर पंक्तीला नाहीत तर आम्ही जेवणार नाही. त्या नंतर त्या स्त्रीयानी आपल्या पतीला बोलावून घेतले.

यजमान म्हणाले हे ब्रह्मवृंदहो, आपण भोजन करा. माझे भोजन झाले आहे. आपणाकरिता शुचीर्भूतपणे दुसरा स्वैपाक केलेला आहे. पण भिक्षूक ऐकेनात.

नाईलाजाने यजमान पानावर बसले, आपोशाणी घेणार इतक्यात यजमान म्हणाले अग लोणचे काढले नाहीस काय ? बरं असू दे. मी घेऊन येतो म्हणून माळ्यावर गेले. बराच वेळ झाला तरी त्यांचा पत्ता नाही म्हणून त्याला बघायला त्याची पहिली बायको गेली; तिचाही पत्ता नाही म्हणून दुसरीही गेली.

अर्जुन कृष्णाचे तोंडाकडे टकमक पहात राहिला, व म्हणाला कृष्णा ही काय भानगड आहे ? मला काय ठावे ? चल आपण पाहू या.

ते दोघे माळ्यावर आले आणि अर्जुनाला धसकाच बसला तिघांची प्रेते तेथे होती 'कृष्णा हे काय ? ' अरे थांब आपण त्यांनाच विचारू या म्हणून कृष्णाने तिघांना जिवंत केले.

कृष्णाने यजमानास विचारले हा काय प्रकार आहे, त्यावर यजमान म्हणाले, 'श्रीकृष्णा तुला सर्व काही माहीत आहे, माझ्याच मुखातून वदवावयाचे असल्यास सांगतो, माझे लहानपणी लग्न झाले काही वर्षांनी माझी पत्नी वयात आली. तिला माहेराहून घरी आणण्याकरिता वडिलांनी तिच्या गावी (माहेरी) पाठविले. मी गावाच्या वेशीजवळ आलो, तो एक बाई मला हाक मारीत आहे म्हणून घोडा तिकडे वळवला व घोड्यावरून उतरून तिच्याजवळ आलो. ती शेणाची टोपलीकडे उभी होती. तिच्याबरोबरच्या मुली निघून गेल्या होत्या. तिने मला विनंती केली ही शेणानें भरलेली टोपली माझ्या डोक्यावर नीट ठेवा, टोपली डोक्यावर ठेवताना मात्र माझ्या अंगास तुमच्या हाताचा स्पर्श होऊ देऊ नका. मी सौभाग्यवती आहे. मी आपल्या अंगाला मुळीसुद्धा स्पर्श करणार नाही. माझ्या अंगास जराही हात लावाल तर तुम्हास देवाची शपथ आहे. तो म्हणाला मुली तू बिलकूल चिंता करू नकोस, मी तुझ्या अंगास यत्किंचितहि हात लावणार नाही, लावीन तर मला देवाची शपथ आहे. याप्रमाणे एकमेकांस वचन दिले व तिच्या डोकीवर ती शेणाची टोपली अलगद ठेवून तो आपल्या वाटेने सासुरवाडीस गेला.

सासुरवाडीस गेल्यावर सासऱ्याने जावयास पाहिल्यावर आनंद झाला व त्याला ओटीवर मानाने बसविले.

पुढे तीच मुलगी शेणाची टोपली घेऊन त्याच घरी आली. यानें तिला बघीतल्यावर मनात चरकला. नंतर सासरेबुवांनी मुलीला गुळ पाणी आणण्यास सांगितले. मुलीनी ह्याला बघीतल्याबरोबर मनात चरकली, कारण टोपली डोकीवर ठेवणारा तिचा नवराच होता नंतर तो बायकोला घेऊन घरी आला.

काही दिवसांनी रात्री ती दोघे एकत्र आल्यावर त्याने विचारले तुला आठवते काय ? त्यावेळेस तिला समजले नाही. नंतर त्यांनी तिला आपल्या निश्चयाची आठवण करून दिली. तेव्हा ती दोघे कोणलाहि न समजता आपापला निश्चय पाळू लागली.

दोन वर्षानंतर वंश वाढण्याकरिता आपल्या बापाला सांगून आपल्या धाकट्या बहिणीबरोबर त्याचे लग्न करून दिले. मुलगी सासरी जाताना सासरे जावयाला म्हणाले ' जसे आपण माझ्या मोठ्या मुलीस सुख दिलेत व प्रेमाने वागवलेत तशाच-रीतीने माझ्या धाकट्या मुलीस सुख द्या व वागवा. हिच्यात व तिच्यात किंचित्‌हि भिन्नभाव ठेवाल तर तुम्हास परमेश्वराची शपथ आहे.

आता भोजन दोन्ही स्त्रीयांनी केलेले, भोजन केले तर त्यांचा स्पर्श होतो म्हणून त्या तिघांनी माळयावर जाऊन आपला निश्चय कायम ठेवण्याकरिता प्रार्थना केली. ती देवांनी मान्य केली व त्यांची सुटका केली नंतर कृष्णाने त्यांना साक्षात् दर्शन दिले व म्हणाला तुमच्या निश्चयाचे फळ तुम्हाला मिळाले आहे. आता तुम्ही सुखानी संसार करा आणि माझ्याकडे लक्ष द्या. अर्जुना ह्याला म्हणतात निश्चय. वेळी प्राणाचीसुद्धा परवा केली नाही.

निश्चयाचे बळ । तुका म्हणे तेची फळ ॥

काम क्रोध लोभ हेच मनुष्यास संकटे उत्पन्न करतात. हे तीन व अहंकारवृत्ति मनुष्याच्या इच्छा तशा निश्चयात निर्बळपणा दर्शवितात.

जो मनुष्य ईश्वरच माझी लाज राखील व माझ्या श्रध्देस सदृढ राखील अशा इच्छेने वागतो. त्याचीच इच्छा परमेश्वर परिपूर्ण करतो. त्याचेच संकटातून रक्षण करतो. पण जो परमेश्वरावर ठेवण्यात येणाऱ्या श्रध्देने ढिला पडतो, त्याचा निश्चय परमेश्वर कसा सांभाळणार ?

दुःखाचे कारण आपला निश्चय, विश्वास, व श्रध्देचा अनिश्चितपणा व हरि-भक्तिपरायणेत ढिलेपणा हेच मुख्य होय.

# श्रीसाई मूळ निराकार !

—डॉ. अनिल जायस्वाल
द्वारा श्रीसाई-क्लिनिक चितारओळ,
नागपूर-२ पिनः ४४०००२ (महाराष्ट्र)

विहितकर्में चित्त शुद्ध ।
होता होईल अभेदबोध ।
शोक मोहादि संसृती विरुद्ध ।
प्रकटेल सिद्ध ज्ञान ते ॥ ११५ ॥

—(श्रीसाईसच्चरित् अध्याय २०)

वाचकांनो । थोडा विचार केल्यास ही गोष्ट सहजपणे लक्षात येण्यासारखी आहे आपण ध्यान व चिंतन करू शकत नसाल तर थोडे विचार करण्याचे तरी श्रम घ्या. विचारही करीत नाहीत—तेथेच आपण चुकतो.

'आपले मन विकृत का ?'

निदान ह्याचा तरी काही क्षण विचार करून पहा.

सांसारीक चिंतनाने मन बिघडते.
प्रभु चिंतनाने मन सुधारते.
जीव अमंगल आहे.
श्रीसाई मंगलमय आहेत.

श्रीसाईबाबांच्या स्मरण–चिंतनाने आपण प्रगती पथावर सहज अग्रेसर होऊ शकतो. आपली काम-वृत्तिच नष्ट झाली तर सर्वकाही मंगलमय होते. जो कामवासनेच्या अधीन नाही, त्याचे सदासर्वदा मंगलच होत असते.

काम ज्यास पराजित करतो तोच जीव व काम ज्यास पराजित करू शकत नाही तोच ईश्वर आहे.

श्रीसाईबाबांना देखील काम कधीच पराजित करू शकला नाही. म्हणूनच ते आपणाकरीता तरी साक्षात् ईश्वर आहेत.

आपले अहित कोण करतो ?

तर आपल्या स्वतःचे अमंगल कार्यच आपले अहित करतात. दुसऱ्या कोणास दोष देणे व्यर्थ आहे. आपल्याविषयी कुणी अपशब्द बोलला तर काही आपल्या शरीरास छिद्रे पडणार नाहीत. तरीपण आपल्यात संयम नसल्यामुळे ते आपल्यास बोचतात, व मग आपणसुद्धा इतरांबाबत शिवीगाळ व निंदा यांच्या-त्यांच्या जवळ करू लागतो.

गुरा-ढोरांना ईश्वराने 'बुद्धि' दिलेली नाही. परंतु ती आपणास सुदैवाने प्रदान केलेली आहे-हेच ईश्वराचे आपणावरील अनंत उपकार आहेत.

परंतु आपण 'बुद्धी' नामक अनमोल हिऱ्याचा जर सदुपयोग केला नाही तर त्यात दोष कोणाचा ?--ईश्वराचा कीं स्वतःचा ? बुद्धीचा सदुपयोग करण्याऐवजी, गुरांढोरात व आपणात मग फरकच काय राहीला ? ते तर विचार करूच शकत नाहीत. परंतु आपण विचार करू शकत असूनही-ते करण्याचे श्रम पदरी घेत नाहीत. विचार न करणाऱ्या मानवापेक्षा श्वान (कुत्रा) तरी श्रेष्ठ मानला गेलेला आहे.

श्री दत्तात्रेय भगवंताभोवती कुत्रेच दिसतात.

श्री साईसमर्थांनी अनेकदा कुत्र्याचे स्वरूप अंगीकार केले-हे वाचकाना माहितच आहे.

श्री क्षेत्र पारडसिंग्याच्या आदिशक्ती महासती अनसूया व श्रीक्षेत्र कोराडीस वास्तव्य केलेल्या; नुकत्याच ब्रह्मांडात विलीन झालेल्या श्री महासती लैलामाँ यांच्या सोबतीस त्यांच्याच ताटात कुत्रेच जेवतात.

अशा एक ना अनेक घटना बहुतांशी वाचक बंधु-भगिनींनी पाहिल्याच असतील.

या सर्वांच्या सोबतीस एकाच ताटात जेवताना कोणी 'मानवास' पाहिले काय ?

फक्त भक्तश्रेष्ठ 'बापूगीर' बुवांना वगळून, या ओळींच्या लेखकाने तरी कधी कोणी-पवित्र आत्म्या-सोबत जेवताना 'मानवास' पाहिले नाही. असे का ? त्याचे कारण म्हणजे कुत्रा हा मानवापेक्षा जास्त ईमानदार मानला गेलेला आहे. म्हणूनच की काय ईश्वराने त्यास पूर्वदृष्टी सुद्धा बक्षिलेली असावी, कोणी आप्त-बंधु, नातेवाईकाच्या देहांतागोदर कुत्रे रडतात-अशी एक आख्यायिका आहे. अर्थात काही अपवाद वगळल्यास, आपण कोणत्या स्तराचे आहोत-हें आपणास सहज उमजेल.

काय श्वानापेक्षाही आपण शूद्रस्वरूपाचे आहोत कीं काय? दयनिय अवस्थ म्हणावी !

इतके असूनसुद्धा " साई रहम नजर रखना " असे बोलून आळवतो व श्रीसाई आपण सर्वांवर 'रहम-नजर' ठेवतातच. कुत्र्यास जर असे बोलता आले असते तर सांसारीक सर्व बाबतीत तो सर्वांच्या पुढे गेला असता. विज्ञानक्षेत्रात तर आजपेक्षा दहा पट उत्कर्ष घडून आला असता–व तो चंद्रावरच काय तर गुरू, शुक्र, शनि ग्रहावरही जाऊन पोहचला असता–व तेथील वातावरणही राहण्यासारखे त्याने बदलविले असते. असो—

कोर्टात न्यायाधिशांच्या हुकुमानुसार चोरट्यास जेल ठोठावण्यात येते. परंतु शिर्डीचेच काय तर या अखिल विश्वाचे राजाधिराज म्हणविणारे श्रीसाईनाथ महाराज किती विशाल हृदयाचे म्हणायचे ! ते नाना प्रवृत्तीच्या विकारग्रस्त मानवास सहजतेने आकृष्ट करून वळणावर आणतात. मुळीच बंदी न करता अशाना ते ईश्वरापायी दृढ निष्ठा बाळगणारा 'बंदा' बनवितात. अशाना ते निर्विकार रूपे असा छंद लावतात की सरतेशेवटी तो पूर्णतः मंगलमयच बनतो. फक्त त्यांना आवश्यकता असते आपल्याकडील दृढनिष्ठा, श्रद्धा, व सबूरीची व हे गुण स्वतःकडे आकृष्ट केलेल्या मानवात ते सहजतेने उमटवितात.

न्यायाधिशांच्या कोर्टात केस ( मामला ) वर्षानुवर्षे धूळ खात पडलेली असते. जेव्हा त्याच्यावर लागण्याचा नंबर येईल–तेव्हाच निकाल लागेल.

नेमकी हिच गोष्ट श्रीसाई महाराजांच्या दरबारासही लागू पडते. फरक फक्त इतकाच की अलीकडील दिरंगाईनुसार तिथे मात्र आपला मामला जास्त काळ 'पेंडींग'मध्ये पडलेला राहू शकत नाही.

प्रत्येक कार्याचा शुभारंभ मंगलाचरणाद्वारा करावा.

श्रीमद्भागवतात तीन मंगलाचरणांचा उल्लेख सापडतो. प्रथम व्यासदेवाचे, दुसरे शुकदेवाचे आणि तिसरे सूतजीचे. आपणही सकाळी, दुपारी, व रात्री झोपण्यागोदर–कुल-दैवताचे किंवा इष्टदैवताचे—ज्या कोणावरही आपली पूर्ण श्रद्धा जडली असेल–अशा दैवताचे मंगलाचरण केलेच पाहिजे. सर्वशक्तीमान ईश्वराच्या कोणत्याही स्वरुपाचे ध्यान करा. स्मरण व चिंतन करा. परंतु या सर्वांस एकाग्रतेची आवश्यकता आहे. एकाग्रता उपजण्यासाठी आपले मनच शुद्ध पाहिजे.

अशुद्ध मन विषय वासनेकडे आकृष्ट होते तर शुद्ध मन परमार्थाकडे निस्वार्थपणे आकृष्ट होते. विषय वासनेकडे जाणारे मन स्वार्थी–तर परमार्थाकडे जाणारे मन निस्वार्थी स्वरूपाचे असते.

वाचकांनो ! आपणा सर्वांचे मन अंशतः शुद्ध व बहुतांशी अशुद्ध स्वरूपाचे आहे. परिणामास्तव आपल्या करवी थोडेबहुत कार्य निस्वार्थपणे घडते तर अधिकाधिक कार्यात स्वार्थच दडपलेला असतो. मानवी-मनाची शुद्धता हळूवारपणे नामस्मरणाद्वारे व इष्ट दैवताच्या चिंतनाने होऊ शकते. करिता आपण सर्वांनी शक्यतोवर मनास प्रभुचरणी स्थीर ठेवण्याचा प्रयत्न करावा. एकाच मंगलमय स्वरूपाच्या चिंतनाने मनशुद्धी निश्चितपणे व सहजतेने होऊ शकते.

' अस्तु वस्तुतः जें निराकार । मायागुणें साकार ।। '–अशा श्रीसाईसमर्थांनी स्वतःस ' अनल–हक्क ' म्हणजे ईश्वर कधीच मानले नाही. ते स्वतःस ' यादे-हक्क ' " अल्लाचा बंदा "–म्हणायचे. सदा सर्वदा " अल्लाह-मालीक " असेच ते बोलत त्यांनी कधी कोणास स्वतःचे ( श्री साईचे ) चिंतन करा–म्हणून उपदेशिले नाही. उलट ते कधी कोणास ' कुराण-शरीफ '–' विष्णुसहस्त्रनाम ', ' भागवत ' ' श्रीज्ञानेश्वरी ' ' श्रीमद्‌भागवत् ' तर कोणास ' गीता-रहस्य ' वाचावयास लावावयाचे.

श्री नानासाहेब चांदोरकरांना, चरणसंवाहन करताना मशिदमाईत बसून श्री साईसमर्थांनी भगवद्गीतेतील चतुर्थाध्याय अंतर्गत येणाऱ्या चौतीसाव्या श्लोकाचे—

' तद्विद्धि प्रणिपातेन 'चे अर्थ किती सुलभतेने समजावून सांगितले ही गोष्ट श्री साईसच्चरितातील अध्याय ३९ मध्ये वर्णिलेली आहे. ( पुढे अध्याय ५० मध्ये सविस्तर विवरण आहे ).

इतके असूनही श्रीसाईबाबांनी कोणास, ' गणपती ', कोणास ' शंकर ', कोणास ' दत्तात्रेय ' तर कोणास श्रीदत्तात्रेयाच्या जन्माच्यावेळी पोटात कळा उमटवणाऱ्या ' श्री सती अनसूया ' मातेच्या स्वरूपात दर्शन दिले. असें असंख्य अनुभव श्रीसाईसच्चरित्रात, व इतर आंग्ल भाषेतील श्री साई-साहित्यात संग्रहीत केले गेले आहेत. जितके प्रेम ते हिंदुशी करायचे तितकेच प्रेम ते यवनांशी करायचे तितकेच श्वानसूकरे ( अध्याय ९ ), सर्प-बेडूक ( अध्याय ४७ ), व शेळ्यांशीही ( अध्याय ४६ ) करायचे.

या ' भूतदये '–द्वारे त्यांना कदाचित् हेच दाखवावयाचे होते, कीः—

"ईश्वर फक्त एक आहे. तोच सर्वव्यापक व निराकार आहे. तोच निरनिराळ्या स्वरूपात निरनिराळ्या भक्तांद्वारे पूजिला व मानला जातो.

राम–रहीम, अल्ला–पैगंबर, येशू–खिस्त वगैरे वास्तविकतः एकच आहेत.

'एकं सद् विप्रा बहुधा वंदति !'

ईश्वराचे स्वरूप अनेक परंतु तत्व एकच.

'दिसतों परि विविध रंगरूपे ।'

कल्याणकारी तो एक ॥'

ईश्वराच्या ज्या कोणत्या स्वरूपात आपले मन आनंदीत होऊन दोलायमान होत असेल, मनास तन्मयता लाभत असेल त्याचेच स्मरण–चिंतन करा. स्नान करून कपाळास चंदन बुक्का फासून सोवळे नेसण्यात काय हाशिल होणार बरे! अहो ही तर बाह्यपवित्रता झाली. बाह्यपवित्रतेऐवजी 'बाह्यदिखाव' म्हटल्यास योग्य संबोधन लाभेल.

ईश्वरास किंवा श्री साईसमर्थांस आपल्या 'मनाची–पवित्रता' पाहिजे. आपली 'आंतरीक–पवित्रता'च त्यांना हवी आहे.

बाह्य–पवित्रते पेक्षा
आंतरीक–पवित्रताच
श्रेष्ठ आहे.

दिव्यासमोर ज्या–ज्या रंगाची काच धरावी त्या–त्या रंगाचा प्रकाश आपणास दिसतो.

'पाणि तेरा रंग कैसा ॥
जिसमें रखे वैसा ॥'

सर्व देवांना नमन करावे. भेदभाव मुळीच करू नये.

परंतु ध्यान–स्मरण–चिंतन
हे फक्त एकाच मंगलमय
स्वरूपाचे करावे.

श्रीसाई सच्चरितात । उल्लेखित केले गेलेले आहेत कीः—

"हे यत्किंचित्ही भूत भौतिक । जगत् चेतनाचेतनात्मक ।
ईश्वरचि हा अद्वितीय एक । निर्धार निःशंक करावा ॥ ११९ ॥

जगद्‌बुद्धीचा हा विवेक । जरी मनासी पटेना देख ।
तरी हे धन हिरण्यादिक । यांचा अभिलाख न करावा ॥ १२० ॥

हेही जरी न घडे तरी । जाणावे आपण कर्माधिकारी ।
आमरणान्त शतसंवत्सरी । कर्मचि करीत रहावे ॥ १२१ ॥

तेही स्ववर्णाश्रमोचित । यथोक्तोनुष्ठानसहित ।
अग्निहोत्रादि नित्यविहित । चित्त अकलंकित होईतो. ॥ १२२ ॥

हा एक चित्तशुद्धीचा मार्ग । दुजा सर्व संगपरित्याग ।
हें न आक्रमिता ज्ञानयोग । कर्म भोगचि केवळ ॥ १२३ ॥ ”

—( अध्याय २० )

थोडक्यात सांगावयाचे :— “ या जगातील सर्व वस्तु ज्यांचे आपण चेतन व अचेतनाची उपमा देतो ह्या कशा आहेत ? तर—‘ यत्किंचित् ’ अर्थात त्या सर्व शक्तीमान ‘ अल्ला मालीक ’ च्या तुलनेत या सर्व शूद्र स्वरूपाच्या आहेत. ईश्वर एक असून तो अद्वितिय आहे—अशीच धारणा आपण केलेली बरी. परंतु सुशिक्षित मानवाच्या बुद्धिस जर ‘ ईश्वर एक आहे ’—हे जर पटत नसेल किंवा तो जर नास्तिक स्वरूपाचा असेल तर कमीत-कमी त्याने ह्या ‘ चंचल धन— वा हरिणासारखे चपळ व एकाच ठिकाणी सदासर्वदा वास न करणाऱ्या ह्या चंचल धन—संपत्तिचा मोह व गर्व कधी करू नये. हेही जर जमत नसेल तर ‘ कर्म करणे भाग आहे ’ या दृष्टीकोनातून सदैव कर्मरत राहावयास हवे । असे आचरण मरे पर्यंत पाळणे-आपले कर्तव्य आहे. कर्म करताना कसलाही विचार करू नये. खाटीकाने शेळ्या कापून विकल्या तर त्यात पाप कसले ? अहो प्रारब्धानुसारच त्यांचा जन्म त्या घराण्यात झाला व त्यास तोच धंदा करणे भाग आहे. परंतु प्रत्येक व्यवहार ईमान-दारीने व मुळीच लबाडी न करता—करावयास हवा. अशी ‘ यथोक्तोनुष्ठानसहित ’ कर्मरत आजन्म राहिल्यास चित्तशुद्धी हळूवारपणे होत जाऊन ज्याप्रमाणे अग्नि केर-कचरा जाळून टाकतो—त्याचप्रमाणे सरतेशेवटी पूर्णतः चित्तशुद्धी होते. हा तर चित्तशुद्धिचा एक मार्ग झाला. दुसरा म्हणजे सगळ्या सग्यासोयऱ्यांचा आपण परित्याग करून ‘ वैराग्य ’ उद्‌भवेल अशी स्थिती निर्माण करावी. याशिवाय ‘ज्ञान’ मिळणे अशक्यच आहे—व आपणास केवळ कर्म भोगणेच प्राप्त आहे ”

परंतु ईश्वर हा एकच आहे—ही गोष्ट निर्विवाद आहे. प्रत्येक देवात त्याच स्वरूपास पाहण्याचा प्रयत्न आपण करावा.

# शिर्डीच्या साईबाबांची सर्वगामी व्यापकता

डॉ. रा. सी. कापडी

राजारामपुरी, कोल्हापूर

● शिर्डीचे साईबाबा हे आधुनिक कालातील सर्वगामी, सर्वव्यापी सर्वत्र संचार करणारी अंर्तज्ञानी सगुण पूर्णावतारी प्रत्यक्ष परमेश्वराची मूर्ती होती. ते (Secular) सर्व धर्मांचे सर्व जातीचे, सर्व वर्णांचे स्पृश्य अस्पृश्याचे अनुसुचित, अविकसीत, आदिवासी, सुशिक्षीत अशिक्षीत मागासलेल्या, सुधारलेल्या सर्व लोकांचे ते होते. हिंदु-मुसलमान, पार्शी, यहुदी, जैन, लिंगायत, कानडी, तामीळ तेलगू सर्व राज्यातील लोक त्यांना मानतात, पूजतात, भजतात. काही पाश्चात्य देशातील लोकही त्यांच्या भजनी लागतात. त्यांच्या निर्वाणाला ६० वर्षे होऊन गेली तरी ते आजहि श्रद्धायुक्त अंतःकरणाने भजणाऱ्या भक्ताला पावतात. त्यांच्या हाकेला ओ देतात. नवसाला साद देतात.

ज्यावेळी बाबांनी शिरडीला मुक्काम ठोकला त्यावेळी ते एक खेडे होते. आज ते गज बजलेले शहरात मोडते. धार्मिक क्षेत्र म्हणून गणले जाते. दुसरे पंढरपूर समजले जाते. गोदावरी तटी ७/८ मैलावर कोपरगाव रेल्वे स्टेशनापासून दूर नसलेले हे ठिकाण अहमदनगर जिल्ह्याचे नाक ठरेल.

बाबा शिरडीत आले तेव्हा त्यांचे वय सुमारे अठरा वर्षाचे होते. यवनी वेषात असल्यामुळे त्यांना प्रथम भेटलेल्या म्हाळसापती वगैरे लोकांनी 'या साई' असे स्वागत केले. हा यवनी वेष बाबांनी समाधी घेईपर्यंत कायम ठेवला. 'अल्लामालिक' 'अल्ला भला करेगा' वगैरे यवनी शब्दोच्चारामुळे बाबा हे यवन आहेत हा समज शेवटपर्यंत टिकून राहिला. सुरवातीला भिक्षेच्या झोळीत मिळेल ते अन्न बाबा एकत्र करून कोळंब्यात टाकून त्यातील चार तुकडे तोंडात घालून बाकीचे मांजरे, कुत्री, पक्षी, पळवीत, किंवा भक्तगण प्रसाद म्हणून नेत असत. त्यांना मिळालेल्या भिक्षेचा विधीनिषेध नव्हता. त्यात सुरुवातीला मांसाहारही असायचा.

हंडीत जे अन्न बाबांच्या स्वतःच्या कष्टाने शिजविले जाई त्यात कधी मांसाहारी लोकांसाठी मांसाहारी अन्नही शिजविले जाई. त्यामुळे बाबा यवन आहेत ही भावना दृढ होत चालली. मशिदीत येणारे हाजी फकीर वगैरे यवनी पाहुणे बाबा स्वतःच्या पंगतीत घेऊन जेवत. कुराण-पढण्यास सर्रास मोकळीक होती. मोठमोठ्याने

फाके घालण्यास आडकाठी नव्हती. त्यामुळे त्यांच्या दर्शनाकरता येणारे हिंदु संस्कृतीचे गाढे विद्वान, शास्त्री, पुराणिक बिचकत असत.

परंतु तीन्ही त्रिकाल मशिदीत होणारे सर्व पूजा आरती, पोथ्या पुराणेची पारायणे, रामायण महाभारत, गीता वगैरेचे वाचनाचे सप्ताह, लोकांना धर्मग्रंथ वाचण्यास आग्रहाने सांगण्याची शिफारस कथाकीर्तनाला मुभा व अहोरात्र चाललेला धुनी यज्ञ हे प्रकार तर बाबा हिंदुच आहे असे भासविणारे होते. त्यामुळे लोक संभ्रमात पडत. बाबांनी हा संभ्रम जाणूनबुजून शेवटपर्यंत टिकवून ठेवला.

त्यामुळे खरोखर बाबा कोण आहेत ? हिंदु की यवन हा प्रश्न अनेक शास्त्री पंडीताना भेडसावीत होता. बाबांच्या निर्वाणानंतर त्यांचे कलेवर हिंदु पद्धतीने किंवा मुस्लीम पद्धतीला अनुसरून न्यायचे यावर तीन दिवस वाटाघाटी चालल्या होत्या. शेवटी पाटील रामचंद्रपंत कोते यांच्या धाकामुळे श्रीमंत बुट्टीच्या बंगल्यात मुरलीधराच्या जागी बाबांची समाधी बांधली गेली.

हिंदु मुस्लीम बांधवांचा समन्वय साधण्याकरिता बाबांचा तर जन्म होता. अवतार होता. हिंदुच्या ब्राह्मण कुळात जन्मल्यामुळे बाबांचे कान टोचले होते. परंतु त्यांचे ७-८ वर्षाखालील बालपण मुस्लीम पिढीत गेले होते. म्हणून तर त्यांची सुंता केली गेली होती. हिंदु की मुस्लीम हा प्रश्न बाबांना अनेकवेळा विचारला गेला होता. एकदा तर समाधी घेण्यापूर्वी दसऱ्याच्या दिवशी नरसिंह अवतार घेऊन बाबांनी वस्त्रहीन होऊन दिगंबर स्थितीत आपली वस्त्रे-मुंड्यासाचा फडका, कफनी लंगोटा वगैरे अग्नीनारायणाच्या भक्ष्यस्थानी अर्पण केली होती व मोठ्याने ओरडून ' पहा मी हिंदू की यवन. नीट डोळे उघडून पहा ' असा पुकारा केला होता.

काही असो. हिंदु का मुस्लीम या वादात न पडता बाबा कोण होते हे अध्यात्मिकदृष्ट्या आपणास पहायचे आहे. मेहरबाबा हे पारशी होते. तुकाराम महाराजांच्या वेळीं प्रसिद्ध असलेले मुस्लीम संत, कबीर, वगैरे संताकडे आम्ही एक साक्षात् **परमेश्वराचा** अंश याच दृष्टीने पहातो. कोल्हापूर जिल्हातील विशाळगडावरील तो दरसाल हिंदुमुस्लीमचा उरुस (जत्रा) भरतो त्यावेळी पिराची आराधना, नवस जे केले जातात ते ईश्वरच्या व्यापक स्वरूपाला स्मरून केले जातात. तसेच हे साईबाबांचे व्यापक स्वरुप आहे.

आज जी धर्मरहीत भारताच्या शासनाकडे शिर्डीची व्यवस्था आहे त्याचे इंगीत हेच आहे. बाबांच्या मंदीरात जरी पहाटे भूपाळयापासून रात्रौ रोज आरतीपर्यंत जो

(नियम बद्ध) पुजा अर्चेचा कार्यक्रम चालतो तो हिंदु पद्धतीने चालत असला तरी मंदीरात समाधीवर मुस्लीम पद्धतीचा गलोल वाहण्याची पद्धत मुस्लीम आहे. म्हणून मंदीराचे दार सर्वधर्मांना सर्व जातीना सताड उघडे आहे. पार्शी धर्माप्रमाणे अग्नी चोवीस तास धुनीच्या रुपाने सतत पेटलेला असतो.

म्हणून भारताचा आज जर कोणी देव कोणता, असे जर विचारले तर तो साई असेच म्हटले जाईल. धर्म कोणता ? साई। पंथ कोणता ? साई । असेंच उत्तर द्यावे लागेल. भारताच्या पहिल्या पंतप्रधानाला व घटना तज्ञाला सिक्युलर धर्मातीत शासनाची जी कल्पना सुचली ती मला वाटते साईबाबांचे स्मरण होऊन सुचली असावी.

आपल्या अवतार कार्यांत बाबांनी जात-पात रुढीत ईश्वरी अवतार दाखविला तो सुद्धा रोगराई दूर करण्याचा प्रथम काखया उचलून जागृती नंतर स्वप्नी जळी स्थळी काष्टी पाषाणी, मी स्वयंभूत आहे' हा सर्व धर्मातील व्यापक संदेश बाबांनी हंसत-खेळत, प्रसंगी नरसिंह अवतारातील क्रोधाचे रुप घेऊन अंतरमुख होऊन, सर्व संताची एकात्मकता सिद्ध करुन मंदिरातील सगुण मूर्तीचा मान, आदर, उपासना करून, मशिदीतील निर्गुण उपासना सांभाळून, सर्व धर्मांचा बोज राखून सिद्ध केले.

पन्नास साठ वर्षे होऊन गेली तरी हे धर्मातीत शिर्डी संस्थान महापुराच्या गतीने वाढत आहे. आकाशाच्या विस्ताराने विस्तारत आहे. हिमालयाच्या छातीने अभंग आहे. ह्या नवीन सांस्कृतीक, धार्मिक विस्ताराची गुरुकिल्ली बाबांच्या खालील वचनात आहे.

शिर्डीस ज्याचे लागतील पाय । टळती अपाय सर्व त्याचे ॥ १ ॥
माझ्या समाधीची पायरी चढेल । दुःख हे हरेल सर्व त्याचे ॥ २ ॥
जरी हे शरीर गेलो मी टाकून । तरी मी धावेन भक्तांसाठी ॥ ३ ॥
नवसास माझी पावेल समाधी । धरा दृढ बुद्धी माझ्या ठायी ॥ ४ ॥
नित्य मी जीवंत, जाणा हेचि सत्य । नित्य घ्या प्रचीत अनुभवे ॥ ५ ॥
शरण मज आला आणि वाया गेला । दाखवा दाखवा ऐसा कोणी ॥ ६ ॥
जो जो, मज भजे । जैसा जैसा भावे ॥ तैसा तैसा पावे, मीही त्यासी ॥ ७ ॥
तुमचा मी भार वाहीन सर्वथा । नव्हे हे अन्यथा वचन माझे ॥ ८ ॥
जाणा येथे आहे साहाय्य सर्वांस । मागे जे जे त्यास ते ते लाभे ॥ ९ ॥
माझा जो जाहला काया वाचा मनी । तयाचा मी ऋणी सर्वकाळ ॥ १० ॥
साई म्हणे तोचि, तोचि झाला धन्य । झाला जो अनन्य माझ्या ठायी ॥ ११ ॥

# तुका म्हणे साई

—डॉ. म. स. बावरे
१०६, रा. बोले मार्ग, दादर, मुंबई २८,

नये वाटू मन । कांहीं न देखावे भिन्न ॥ १ ॥
पाय विठोबाचे चित्ती । असो द्यावे दिवसराती ॥ २ ॥
नये काकुळती । कोणा यावे हरिभक्ति ॥ ३ ॥
तुका म्हणे साई । करील कृपेची विठाई ॥ ४ ॥
छोडे धनमंदीर बन बसाया । मांगत टुका घरघर खाया ॥ १ ॥
तीनसो हम करावो सलाम । ज्या मुख बैठा राजाराम ॥ २ ॥
तुलसीमाला बहुत चन्हावे । हरजीके गुणनिर्मल गावे ॥ ३ ॥
कहे तुका जो साई हमारा । हिरनकश्यप उन्हें मारहि डारा ॥४॥

साहित्य रस मालेने प्रसिद्ध केलेल्या संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या अभंग गाथेत वरील अभंग अनु. नं. २४९५ व ४४७१ वर छापले आहेत. महाराजांच्या इतरांनी छापलेल्या गाथेत अभंग अनुक्रम निराळे आहेत हे जिज्ञासूंच्या माहिती-करिता देत आहे.

तुकाराम महाराज शके १५७१ मध्ये वैकुंठाला गेले हे सर्वश्रुत आहे. महाराजांच्या जवळ–जवळ ३०० वर्षानंतर श्रीसाईबाबा प्रसिद्धीला आले. असे असून महाराजांच्या अभंग २) मध्ये जे वर्णन फकिराचे केले आहे ते बाबांनाच उद्देशून आहे असे वाटते. साक्षात्कारी महापुरुषांना भविष्य अवगत असते असे सर्वसाधारण मत आहे. विशेष म्हणजे तुकाराम विठ्ठल भक्त होते, व त्यांच्या आवडत्या दैवताचे होणारे गुणगाण ज्या भविष्यकालीन व्यक्तीकडून होणार आहे त्याचे वर्णन महाराज अचूक करणे काही अशक्य नाही. कै. दाभोलकरांनी लिहिलेल्या "श्रीसाईचरित्" ग्रंथातून नमुन्यादाखल काही घटना खाली देत आहे. त्यावरून बाबांना विठ्ठलाबाबत किती प्रेम होते ते दिसेल.

अ) श्री भगवंतराव क्षीरसागरांना पाहून बाबा म्हणाले, तो (भगवंताचे वडिल) होता दोस्त माझा । हा त्या माझ्या स्नेहाचा सूत । म्हणूनि यासी मी

आणिले खेचित। नाही कधी हा नैवेद्य करीत। उपाशी ठेवित मजलाही। विठ्ठला सही ठेवि उपाशी। म्हणून शिर्डीस आणिले यासी। आता देईन आठवणीसी। लाविन पूजेसी याजला।"

आ) पंढरपूरचे रहिवासी दासगणू यांचेकडून बाबांनी नाम-सप्ताह करून घेतला. दाभोलकर लिहितात, "आज्ञा एकदा दासगणूला। नाम-सप्ताह मांडावयाला। होता गणुदास वदती तयाला। विठ्ठल प्रकटला पाहिजे। बाबा तव छातीस हात लाविती। दासगणूसी निक्षूनी वदती। होइो प्रकटेल विठ्ठल मूर्ति। भक्त भावार्थी पाहिजे।"

इ) साईभक्त नाना चांदोरकर एकदा पंढरपूरला जाण्यापूर्वी बाबांच्या दर्शनास येण्यास निघाले. निमगामच्या शिवेवर चांदोरकर सहकुटुंब असतानाच बाबांनी द्वारकामाईत जमलेल्या मंडळीस भजन म्हणावयास सांगितले ते असे, "पंढरपूरला जायचे जायचे। तिथेच मजला राहयाचे राहयाचे। घर ते माझ्या रायाचे।" भजन चालू असतानाच चांदोरकर सहकुटुंब द्वारकामाईत आले व त्यांना आश्चर्य वाटले की बाबांना हे सर्व आधीच कसे कळले?

ई) साईबाबांनी द्वारकामाईत तुळशीवृंदावन बांधून घेतले व ते भक्तांना पूजा करण्यास सांगत असत असे चरित्रात सांगितले आहे. आजही गुरुवारी बाबांच्या पादुकांची पालखी वृंदावनापासूनच सुरू होते.

उ) बाबांच्या चरित्र वाचकांना माहित आहे की एकदा ना. खापर्डेंच्या कुटुंबाला बाबांनी मुखाने "राजाराम, राजाराम" बोलत जा असे सांगितले. आपल्या स्मरणात जे नाव सतत असते ते सहज बाहेर येते यावरून बाबांच्या स्मरणात "राजाराम, राजाराम" सातत्याने असलेच पाहिजे.

ऊ) पहिल्या अभंगात तुकाराम महाराजांनी सर्वभूती भगवंत पाहण्यास सांगण्याकरता दिवसराती चित्तात विठोबाचे पाय असावे असे सांगितले आहे. कोणाकडे काकुळतीने मागण्यापेक्षा हरिभक्ती करावी म्हणजे विठ्ठल कृपा करील. बाबांनीही डुकरे, कुत्रे, जनावरे तसेच असहाय्य आंधळे पांगळे ह्यांना अन्न-पाणी द्यावे असा उपदेश भक्तांना केला आहे. असे केल्याने विठोबाची कृपा संपादन करता येईल. परमेश्वर संतुष्ट होईल. बाबांनी भक्तांच्या ठिकाणी असा अद्वैत भाव जागा केला.

ए) "श्रद्धा व सबूरी" ही बाबांची दोन महत्वाची तत्त्वे ह्या संबंधात तुकाराम महाराजांच्या एका अभंगाचा उतारा खाली देत आहे.

" सत्य संकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ ॥ १ ॥
येथे अलंकार शोभती सकळ । भावबळे फळ इच्छेचे ते ॥ २ ॥
अंतरीचे बीज जाणे कळवळा । व्यापक सकळा ब्रह्मांडाचा ॥ ३ ॥
तुका म्हणे नाही चालत तातडी । प्राप्तकाळ घडी आल्याविण ॥ ४ ॥

ह्यात " भावबळे फळ इच्छेचे ते " म्हणजे " श्रद्धा " " तुका म्हणे नाही चालत तातडी । प्राप्तकाळ घडी आल्याविण " म्हणजे " सबूरी " धीराने घेणे. उगाच घाई नको.

वरील दिलेल्या स्पष्टीकरणावरून वाचकांच्या लक्षात येईल की ज्यावेळी बाबांना म्हाळसापतीने " आवो साई " म्हटले त्यामागे विठ्ठलाची प्रेरणा असावी व साक्षात्कारी संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या अभंगात 'साई' ह्या नामाचा तसेच फकिराच्या वर्णनाचा जो निर्देश आहे तो विठ्ठलानेच करून घेतला असावा असे म्हणण्यात काय अनुचित आहे ?

## बाबांचा शामसुंदर

श्री साईबाबांच्या सान्निध्यात शामसुंदर घोडा कसा काय आला. त्याची हकीगत मोठी मजेदार आहे.

इ. स. १९११ मध्ये वाईचे मे. गोगे मामलेदार दरमहा गुरुवारी श्रीसाई दर्शनाला येत. त्यांचेबरोबर श्री. होरकर सर्कल इन्स्पेक्टरही येत. त्यांनी आपल्या घोडीला बच्चा नाही म्हणून ती घोडी श्रीसाई दर्शनाला आणली व बाबांचा आशीर्वाद मागितला. त्यावेळी श्रीसाईबाबांनी आपल्या हातानी त्यांना प्रसाद म्हणून उदी दिली व ती पाण्यात घालून घोडीला पाजावयास सांगितले घोडीला बच्चा झाला तोचा हा शामसुन्दर होय. श्रीसाईच्या दरबारी तो आरतीच्या वेळी नमस्कार करीत असे. हा नमस्कार करण्यास त्याला श्री. नानासाहेब खाजगीवाले यांनी शिकवीले. सध्या घोड्याची समाधी लेंडी बागेत आहे व त्यावर ब्राँझ धातूचा घोडाही आहे. असा हा शामसुन्दर बाबांचा लाडका.

—सौ. उषा मुळे शिरडी

# ५४ रु. किंमतीचे पाच अपूर्व ग्रंथ ४१ रु. त घरपोच

जीवनमुक्तीबद्दल सविस्तर विवेचन व मार्गदर्शन करणारा ग्रंथ !

## मायेपासून दूर ....दूर !

● योगीराज अ. ल. भागवत

मूळ किंमत १२ रु. / सवलतीत ९ रु.

मनस्तापाकडून.... मनःशांतीकडे नेणारा ग्रंथ !

## भावातीत ध्यान

● वि. वि. गोखले व स. भा. रानडे

मूळ किंमत १२ रु. / सवलतीत ९ रु.

मृतात्म्यांच्या अदृश्य जगाची थरारक सफर घडविणारा ग्रंथ !

## प्लँचेट आणि परलोक जीवन

● वि. के. फडके

मूळ किंमत १२ रु. / सवलतीत ९ रु.

परामानसशास्त्राच्या अज्ञात दालनाची कवाडे उघडणारा ग्रंथ !

## अतींद्रिय शक्तीचा विकास

● मा. मधुकर दिघे

( भाग : पहिला ) मूळ किंमत १५ रु. / सवलतीत १२ रु.

शारीरिक व मानसिक पीडा दूर करण्यासाठी प्रभावी मंत्र व उपासना

## ग्रहपीडा निवारण

● दामोदरशास्त्री दाते

मूळ किंमत ३ रु. / सवलतीत २ रु. प्रसिद्धी : १७ एप्रिल १९८०
सवलत : ३१ मे १९८० पर्यंत सर्व प्रमुख पुस्तक विक्रेत्यांकडे नोंदणी
चालू आहे. द्वारा / सदानंद प्रकाशन, १२८६ सदाशिव पेठ,
चिमण्या गणपतीजवळ, पुणे ३०, दूरध्वनी ४४१९२५
मनिऑर्डर ' अंजली पब्लिशिंग हाऊस ' चे नावावर पाठवावी.

# * क्षमाशिल बाबा *

—डॉ. सुमन खानविलकर
बॉंबेपूना रोड, लोणावळा

● मे महिन्याचे दिवस पण लोणावळयात मात्र ना थंडी ना उन्हाळा अशी मस्त हवा होती. गावात सगळीकडे जत्रेचे वातावरण असावे असे वाटत होते. कारण निरनिराळ्या ठिकाणाहून लोक मुलबाळ घेऊन पिकनिकला आली होती. पिकनीक म्हणजे निरनिराळया ड्रेसची हौस पुरविणें, पिपाण्या वाजवणें आरडा-ओरडा करत गाणी म्हणत रस्त्याने जाणें.

याच दिवसात माझी मुलगी व जावई त्यांच्या मुलाला घेऊन आली होती. मुलगा अडीच वर्षाचा होता. सर्व गप्पा मारत बसले होते. मध्येच सिनेमाचा विषय निघाला. जाण्याचे ठरले. इतक्यात आमची मोलकरीण बाई रॉकेलला पैसे द्या रॉकेल आले आहे असे म्हणत आली. तिला पैसे दिले तिने डबा रिकामा केला, व घेऊन गेली. या गडबडीत मुलीच्या मुलाला तहान लागली. त्यानें पाणी मागितले सुनेने उठून पाणी दिले व परत बाहेर आली. परंतु तेवढ्या पाण्याने अवधूतची तहान भागली नव्हती. त्याने स्वतःच्या हाताने पाणी घेतले व प्याला हे माझ्या मुलाच्या मुलाने पाहिले. तो त्याच्यापेक्षा ३ वर्षांनी मोठा आहे तो लगेच ओरडला, आई अवधूतने रॉकेल घेतले व प्यायला. झाले सारा व्यूह पालटला लगेच त्याच्या तोंडाचा, हाताचा वास घेतला तर रॉकेलचाच वास. लगेच त्याला घेऊन डॉक्टरकडे गेले. हॉस्पीटलमध्ये ॲडमिट केले. सलाइन लावले उलटीचे औषध दिले पण रात्री आठ वाजले तरी काहीच फायदा झाला नाही. तो त्याच्याच गुंगीत. हाक मारली. हालवले तरी काही नाही. डॉक्टरनी घरी नेण्यास सांगितले. मुलगा बोलत नाही, संडास नाही, लघवी नाही ओकारी नाही. काय करावे सुचेना त्याला घरी तर घेऊन आले.

घरी आल्यावर बाबांचा फोटो पाहिला आणि आम्हा सर्वांनाच रडू कोसळले. दिनवदनाने बाबांना हाक मारली व मनोमन प्रार्थना करून त्यांना सांगितले की तुमच्याच उदीच्या प्रतापावर, आता काय झाले तर तुमच्या उदीचे प्रताप आम्ही खूप ऐकलेत व स्वता अनुभवलेत तरी आमचे काही चुकले असेल तर माफ करा व दिलीत तेवढी शिक्षा पुरे. अवधूतला आराम पडू दे. तुमच्या नावावरूनच त्याचे मी हे नाव ठेवले आहे, बाबा दया करा, बाबा दया करा.

लगेच उदी पाण्यात घातली व सर्व अंगाला लावली. उदीचे तयार केलेले तीर्थ सारखे थेंब थेंब पाजणे, उदी लावणे व सर्वांनी फक्त बाबांचे नामस्मरण चालू केले.

जशी रात्र होत चालली तसे सर्वांचे धैर्य खचू लागले काय करावे सुचेना. मी सर्वांना धीर देत होते बाबा आपले आहेत, सबूरी धरा. त्याची आई सारखी आई काय करू ग असे म्हणत होती. मी म्हटले काही करू नको बाबांचे नाव घे.

अशा परिस्थती मध्ये दोन वाजले त्याला लघवी झाली. थोड्या वेळाने एवढी मोठी उलटी झाली की तो घाबरलाच आणि आम्हीसुद्धा उलटी पाहून व तो निचेत पडलेला पाहून घाबरलो. प्रथम उलटीसाठी प्रयत्न तर आता पाहून घाबरलो काय करावे मध्यरात्रीची वेळ बाबांचा सारखा धावा चालू होता. थोड्या वेळाने संडासला झाले व चार वाजता डोळे उघडले व आई हाक मारली, आईला ओळखले तिने घेतले त्याला मग थोडी कॉफी दिली. चांगला बोलायला लागला मग खेळ पुढ्यात दिला व दुसऱ्या मुलांना उगाचच त्याच्याकडून घ्या सांगितले त्यांनी खेळ घेतला याने भांडून घेतला मग मात्र बरे वाटले.

सर्वांनी बाबांना नमस्कार केला व अश्रुपूर्ण डोळयानी बाबांची क्षमा मागितली. नकळत आमच्या हातून झालेल्या चुकीची बाबांनी त्याला बरं करून क्षमा केली कारण रॉकेल पातेल्यात ठेवणे हे आमचे चुकले होते. **असे आहेत क्षमाशिल बाबा.**


## शेगावच्या श्रीगजानन महाराजांच्या भक्तांसाठी

● श्रीदासगणू कृत श्रीगजानन महाराज लीला या ग्रंथातील निवडक प्रसंगाना श्री. ग. दे. कुलकर्णी यांनी ८४ अभंगात गुंफलेले आहे. ते श्रीसाईलीला मासिकाच्या सप्टेंबर ७४ मधील अंकात प्रसिद्ध झालेले आहे. नित्य पाठासाठी स्तोत्र रुपात ते प्रसिद्ध करू इच्छिणाऱ्यांनी याबाबत पुढील पत्यावर लिहावे अशी विनंती- श्री. ग. दे. कुलकर्णी, 'कुलदीप' तांबरी मु. पो. उस्मानाबाद,-४१३५०१

### श्रीसाईलीला सहाव्या लेखक कवी–स्नेह संमेलन प्रसंगी

# परमपूज्य श्री. गोदावरी माताजींचा शुभ संदेश

आपण सर्वजण येथे श्रीसाई-संमेलनासाठी जमलो आहोत. संमेलन म्हणजे मीलन होणे, ऐक्य होणे, संमेलनासारख्या सामुदायिक कार्यात भिन्न स्वभावाच्या भिन्न धर्माच्या प्रत्येक मनुष्याला अहंभाव सोडावा लागतो. सर्वांची मने कार्यामध्ये एक होत असतात. तेव्हा सर्वांनी आपले मन श्रीसाईंच्या चरणी अर्पण करून त्यांच्याशी एक्यत्त्व पावावे, ह्याचकरिता हे संमेलन आहे.

साक्षात् सर्वव्यापी व धर्मातीत परमात्मा श्री साईबाबांसारख्या महान् सत्पुरुषाच्या रुपात प्रगट झाला आहे. 'साई' शब्दाचा अर्थ काय होतो, की, तो सः + आई ते मातृस्वरूप आहेत, व सर्व साईभक्त ही त्यांची लेकरे आहेत. ज्याप्रमाणे मातेला सर्व मुले सारखी, त्याप्रमाणे साईबाबांजवळ सर्व धर्म व जाती सारख्याच आहेत. जे लोक आपल्या धर्मानुसार व भक्तिप्रेमाने त्यांना भजतात, त्या सर्वांना साईबाबा साक्षात्कार व अनुभव देत आहेत, व पुढे ही निश्चित देतील. ज्या बुद्धींच्या जोरावर मनुष्याला कर्तृत्वाचा मोठेपणा मिळतो, ती बुद्धि देणाऱ्या साई–परमात्म्याची नुसती आठवण प्रत्येक लहान–मोठ्या कार्याच्या वेळी अंतःकरणपूर्वक केली; तरी ते श्रीसाई सर्वांचा उद्धार करून सर्वांना एकाच ठिकाणी नेतील.

सत्पुरुषांची वृत्ति 'वसुधैव कुटुम्बकम्' अशी असते. त्यामुळे संतांच्या दरबारात सर्वांना प्रवेश मिळतो, म्हणूनच साई–बाबांच्या मंदिरात सर्व जाति–धर्मांचे लोक येऊन भक्तिभावाने राहून आपले कल्याण साधून घेताना आढळतात. सर्वांशी प्रेमाने बंधुभावाने माणुसकीने वागा, हाच सर्व मानवजातीस साईबाबांचा संदेश आहे.

साईबाबांचा भक्तिचा संदेश घरोघरी पोचविण्याचे थोर कार्य साई-लेखकांनी चालविले आहे. अलीकडे ५–६ वर्षांपासून साई-लीला मासिकाच्या या लेखकांचे संमेलन भरविण्याची प्रथा सुरू झाली आहे. त्यामुळे ठिकठिकाणचे साई-लेखक शिरडी क्षेत्राच्या पवित्र स्थळी एकत्र येऊन साईबाबांच्या अवतार कार्यासंबंधी त्यांची चर्चा व चिंतन घडते, त्यामुळे साई-भक्तिच्या देशव्यापी चळवळीत नवचैतन्य निर्माण होऊन तिला एक वेगळीच चालना मिळते. म्हणून हे संमेलन आयोजित करणाऱ्या अधिकारी वर्गास, जेवढे धन्यवाद द्यावे, तेवढे थोडेच. संमेलन यशस्वी करण्यासाठी सहकार्य करून हातभार लावणाऱ्या साई-लेखकांचाहि यात वाटा आहे. त्या सर्वांना साईबाबांचे शुभ आशीर्वाद, साईबाबांच्या कृपाशीर्वादाचे छत्र या सर्व साईभक्तांवर सदा सर्वदा निरंतर राहो.

☆ ☆ ☆

# श्रीसाईबाबा आणि त्यांचे शिष्य उपासनी !

—श्री. रघुनाथ शं. जुन्नरकर
कोझीनूक, मालाड.

© शिरडीच्या साईबाबांना शिष्यच नव्हता असं विधान कै. अण्णासाहेब दाभोलकर लिखीत शिरडी संस्थानानं प्रसिद्ध केलेल्या 'श्रीसाई सच्चरित ' या अधिकृत ओवीबद्ध ग्रंथाच्या प्रस्तावना कारानं केलं आहे. पण हे चुकीचं आहे हे माझ्या या लेखात सिद्ध करण्याचा मी प्रयत्न करीत आहे. साकुरी येथील श्री उपासनी कन्या कुमारी आश्रमाचे संस्थापक कै. श्री उपासनी महाराज हे श्रीसाईबाबांचे शिष्य होते. इतकचं नव्हे तर ते त्याचे एकमेव शिष्य होते. असं असूनही उपासनींचा नाममात्र उल्लेख ग्रंथाच्या लेखकानं केला आहे. कै. काकासाहेब उर्फ हरी सखाराम दीक्षित दासगणू, नानासाहेब चांदोरकर, इ. वि. साठे, बाळासाहेब देव, बापुसाहेब जोग, ग्रंथाचे लेखक स्वत: अण्णासाहेब दाभोलकर, माधवराव देशपांडे उर्फ शामा इत्यादी बाबांची मोठमोठी विद्वान, सुशिक्षित, प्रतिष्ठीत आणि नामवंत भक्त मंडळी साईबाबांच्या सतत सान्निध्यात असत आणि त्यांचाच नाम निर्देश या ग्रंथात प्रामुख्याने असून श्री. उपासनीं सारख्या थोर आणि साईंच्या एकमेव शिष्याचा उल्लेख या ग्रंथात केवळ नाममात्र असावा ही खेदाची गोष्ट आहे. म्हणून माझ्या अलिकडेच प्रसिद्ध झालेल्या 'मशिदीत प्रगटला परमेश्वर !' या कादंबरीतही बाबांच्या या एकमेव महान शिष्यावर मी भरपूर प्रकाश झोत टाकला आहे. दाभोलकरांच्या या विद्वद्‌मान्य अधिकृत ग्रंथातील उपासनींचा हा नाम मात्र उल्लेख केवळ सहज नसून हेतुपुरस्सरच असावा अशी माझी प्रामाणिक समजूत आहे. कारण ज्या ग्रंथात लहान सहान भक्तांचाही उल्लेख गौरवपूर्ण केलेला आढळून येतो त्यात अनुल्लेखानं उपासनींना डावलण्याचा प्रयत्न स्पष्ट उमगून येतो. विशेष म्हणजे या साई चरित्रात उपासनींचा 'भक्त श्रेष्ठ उपासनी' असा निर्देश असूनही त्यांचा आणि साईबाबांचा कितपत आणि कसा संबंध होता यावर ग्रंथकारानं यत्किंचितही प्रकाश टाकलेला नाही. अशा या 'भक्त श्रेष्ठावर' करण्यात आलेला हा अन्याय या ग्रंथातील एक सुस्पष्ट विसंगतीच आहे हे खास ! असं हे का व कसं घडलं असावं. ?

मागाहून घडलेल्या घटनांमुळे तर उपासनीना शिष्य मानण्यात श्री साईबाबांची चूक झाली असं या ग्रंथकाराना, त्यांच्या सल्लागाराना आणि तत्कालीन शिरडी संस्थानाच्या विश्वस्ताना वाटलं तर नसावं ? कदाचित याचेच पडसाद दासगणू सारख्या जबाबदार आणि लोकप्रिय कीर्तनकार आणि ओवीबद्ध संत-वाङ्मय चरित्रकाराच्या

लिखाणातही उमटून त्यात श्री उपासनी महाराज यांची नालस्तीच झालेली दिसून येते. म्हणून सत्य स्थितीवर प्रकाश पाडण्यासाठी या लेखात श्रीसाईबाबांचं साक्षात् अवतारी पुरुष म्हणून मूल्य मापन करून उपासनीना शिष्य म्हणून आपलं सर्वस्य देण्याचा संकल्प त्यानी का व कसा केला आणि त्या मागील त्यांची मनोभूमिका कोणती होती हेच सांगण्याचा माझा अल्पसा प्रयत्न आहे.

प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की नामवंत आणि विद्वान माणसानीसुद्धा संत-सत्पुरुषाच्या विरूद्ध बोललेलं, लिहिलेलं अथवा छापून काढलेलंही सर्वच योग्य, सत्य, अभ्यासपूर्ण, स्वानुभवायुक्त, निस्वार्थी आणि निपक्षपाती असतंच असं नाही. कारण काही वेळा त्यात त्यांचे हित संबंधही गुंतलेले असतात. सत्पुरुषावर अधिकार वाणीत लिहिणारा लेखक स्वतः अहंकार रहीत आणि आत्मज्ञान समजण्याच्या निदान मार्गावरील वाटसरू असावाच लागतो. त्याखेरीज त्याचं लिखाण समतोल होऊच शकत नाही. या दृष्टीनं मद्रास येथील साईसमाजाचे कै. श्री नरसिंह स्वामी यानी अत्यंत निपक्षपातीपणानं संशोधन करून साई आणि उपासनीचे गुरु-शिष्यत्त्व संबंधावर खूपच प्रकाश टाकला आहे. स्वतः न्यायाधीश असल्यानं कै दाभोलकरांच्या हातूनही उपासनींच्या विरूद्धच त्यानीही लिहिलं असतं तर ते त्यांचं वैयक्तीक मत म्हणून समजता आलं असतं. असं न करता त्यांचा 'भक्तश्रेष्ठ' म्हणून उल्लेख करूनही त्यांनी त्यांना न्याय दिला नाही म्हणून वाईट वाटतं ! कै. दासगणूनी तर उपासनींच्या विरूद्ध लिहून स्वतःचीच प्रतिमा डागाळून घेतली आहे. कारण नंतर नंतर तर दास-गणूनाच पुष्कळ लोक संत मानीत, तेव्हा ही संतत्त्वाची पदवी मागं लागल्यानंतर तरी त्यांनी स्वतः उपासनींच्या बाबतीत केलेली विधानं मागे घ्यायला हवी होती. ते शोभून दिसलं असतं. त्यात त्यांचा मोठेपणा दिसून आला असता. दासगणू गेले आणि कालांतरानं त्यांनी उपासनीबद्दल केलेली विधानंही लोक विसरून जातील. कारण त्यांच्याशिवाय अनेकानी श्री उपासनी महाराजांच्यावर उभारलेली कुभांडं आणि त्यांना बदनाम करण्याचे सर्वथैव प्रयत्न धुळीला मिळाले असून उपासनीनी निर्माण केलेल्या साकुरी येथील कन्याकुमारी आश्रमाचं चाललेलं सांस्कृतिक, धार्मिक, पारंपारीक आणि वेदकालीन संस्कारांचं उच्च कार्य त्यांच्या नंतरही आज-तागायत चालु असून दिवसेनुदिवस अधिकाधिक तेजानं ते तळपत आहे. अनेक मान्यवर साक्षात्कारी संत त्या आश्रमाला भेट देऊन उपासनींची' त्यांच्या या कन्या-कुमारी आश्रमाची, आणि तिथल्या या अविरत आणि अमर कार्याची मुक्त कंठानं स्तुतीच करीत आहेत. या एकाच गोष्टीवरून श्रीसाईबाबांनी याच चिरकालीन कार्या-साठी उपासनींची शिष्य म्हणून निवड केली होती हे आता सिद्ध झालंच आहे. तरीही उपासनींची साईंचा शिष्य होण्याची पात्रता आणि त्यांच्यावर पूर्ण करण्याची श्रीसाईनाथांची सद्गुरू म्हणून योग्यता याचा आपणास विचार करणं भाग आहे.

सर्व प्रथम श्री उपासनींचा दाभोलकरांनी सुद्धा ' भक्त श्रेष्ठ ' म्हणून उल्लेख केला आहे ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. ही गौरवशाली पदवी देऊन दाभोलकरांनी उपासनींना सर्व भक्तात श्रेष्ठ मानलं हे उघड आहे. पण त्यांना त्यांनी केवळ ' भक्त ' म्हटल्यानं प्रस्तावनाकारानं बाबांना शिष्य नव्हताच हे म्हणणं क्रमप्राप्तच होतं. दाभोलकरानी उपासनींना शिष्य न ठरविता भक्त म्हणूनच ठरवावं हीच भूमिका कदाचित् या सर्व उच्च भक्तानी घेण्याचं ठरविल्यानं मनात असूनही दाभोलकरानी शिष्याऐवजी उपासनींचा ' भक्तश्रेष्ठ ' इतकाच उल्लेख केला असावा. ते काहीही असो. इतकं खरं की प्रत्यक्ष बाबांनीही उपासनींना आपला शिष्य म्हणून संबोधिल नसलं तरी आपल्या गूढ वा स्पष्ट बोलण्यानी त्यांनी उपासनी हाच आपला खरा-खुरा शिष्य आहे हे अनेक तऱ्हेनं सूचीत केलेलं होतं हे खास. शिवाय उपासनींच्या बाबतीत त्यांचं तसं वागणही होतं हे अनेकानी पाह्मलं आहे. याच कारणास्तव कै. अण्णासाहेब दाभोलकरांना उपासनींना निदान ' भक्तश्रेष्ठ' म्हणणं भाग पडलं असावं. श्रीसाईबाबांनी उपासनी हेच आपले शिष्य आहेत हे वारंवार कसं सूचीत केलं आणि त्यांना शिष्यत्वाचं पूर्णत्व देण्यासाठी काय केलं हे पाहण्यापूर्वी भक्त आणि शिष्य या दोन शब्दातील फरक लक्षात घेतला पाहिजे. शिष्य या शब्दाबाबत सर्वसामान्य सुशिक्षित माणसं सुद्धा नेहमीच गल्लत करताना आढळून येतात. मला तर वाटतं हा शब्द सर्रास चुकीच्या अर्थानं वापरला जातो. कारण संत सत्पुरुषांकडे जाणाऱ्या प्रत्येकाचा ही मंडळी त्या संताचा शिष्य म्हणूनच उल्लेख करतात. अर्थात हे खरं नसतं. संत सत्पुरुषांकडे जाणारी सर्व साधारण मंडळी त्यांची केवळ भक्त असतात. ही भक्ति अपेक्षापूर्ण असते. व्यावहारीक, धार्मिक, क्वचित् आधिभौतिक मार्गदर्शनाच्या किंवा इतर इच्छा पूर्तिसाठी असते. त्या साठीच ही मंडळी त्या संताची भक्ती करतात, सेवा करतात, सान्निध्यही मिळवितात. त्यातील काही सतत सान्निध्यानं त्या सत्पुरुषाच्या पश्चात त्याच्याच गादीवर बसून त्याचा मठ, आश्रम आणि गादीही चालवितात. असा गादी चालविणारा भक्त त्या सत्पुरुषाचा शिष्य असू शकतो का! मला हे पटत नाही. सत्पुरुषाचं शिष्यत्व हा आध्यात्मिक वारसा असतो. तो गादीवर बसून मिळत नसतो. कारण शिष्य हा केवळ भक्त किंवा अनुयायी ( Follower) असून भागत नाही. तो अनुग्रहीत ( Recipient ) असावा लागतो. हा अनुग्रह होण्यासाठी गुरु आणि शिष्य दोघेही फारच वरच्या आध्यात्मिक पातळीवरचे असावे लागतात. तशी अवस्था दोघांचीही असेल तर शिष्याला आपली सेवा न करताही, किंवा स्वतःच्या नित्य सान्निध्यात न ठेवताही आणि वर वर सकृतदर्शनी अनुग्रहाची कोणतीच क्रिया न दाखविता असा पूर्ण गुरू आपल्या अध्यात्मिक कृपेचं दान केवळ मनःचक्षुंच्या दृष्टीक्षेपानं बहाल करीत असतो. ही सर्व नकळत होणारी क्रिया असून

त्यासाठी त्याच लायकीचा शिष्य असावा लागतो. या अदृश्य कृपेनेंही केवळ हा शिष्य पूर्ण सत्पुरुषावस्थेला जात असतो. म्हणून शिष्यत्वाची निवड ही सर्वसामान्य भक्तांमधून होत नसून शिष्याच्या जन्मोजन्मीच्या पूर्व संस्कारावर अवलंबून असते. या दृष्टीन श्रीसाईबाबांचे उपासनींच्या बाबतीतील उद्गार "मी याला माझ्या सारखा करीन" हे लक्षात घेतले पाहिजेत. बरं इतकं म्हणूनच ते थांबले नव्हते तर उपासनीना शिरडीतच ठेऊन घेऊन आणि तत्पूर्वी ते बाहेर दूर असतानाही त्यांच्यावर या अदृश्य गुरूकृपेचा वर्षाव आणि अनुग्रह करून त्यांनी त्यांना आपलं शिष्यत्व त्यांनी न मागताही खऱ्याखुऱ्या अर्थानं अर्पण केलं.

अशी कृपा होण्यासाठी उपासनींची पात्रता काय होती ? एक तर साईबाबा त्यांच्याबद्दल नेहमीं म्हणत, "अरे, तुझा आणि माझा युगानुयुगे ऋणानुबंध आहे!" थोडक्यात या गुरू शिष्य जोडीचा संबंध अनेक जन्मांतरांपासून चालत आलेला असला पाहिजे. यावरून उपासनी योगायोगानं साईबाबांच्याकडे पोहोचले नसून साईबाबा या जन्मीही त्यांची वाट पाहून होते आणि आपल्या संकटपानंच त्यांनी त्यांना आपल्याकडे ओढून आणलं होतं. उपासनींच्याही पूर्वजन्माची जी माहिती उपलब्ध आहे ती अशी. गत जन्मी मुल्हेर येथे ते उद्धव स्वामी म्हणून वावरत असून त्यांच्या निर्वाणा-नंतर त्यांच्या समाधीचे दर्शन घेताना उपासनींच्या आईला आपण तुझ्या उदरी जन्म घेऊ असा दृष्टांत त्यानी दिला. थोडक्यात उपासनी हे पूर्व जन्मीही सत्पुरुषावस्थेतच होते. पूर्व जन्माच्या सिद्धांतावर कोणाचा विश्वास असो नसो पण हे सत्य आहे की हे उच्च कोटीचे आत्मे जीवन मुक्तिपेक्षा लोककल्याणासाठी पुनर्जन्मच पसंत करीत असतात.

उद्धव स्वामींच्या पुनर्जन्माला उपासनी घराणे हे अतियोग्य स्थान होते. उच्च संस्कारशील, धार्मिक, सात्त्विक आणि सुसंस्कृत अशा या सच्छील घराण्याची पार्श्वभूमी पूर्ण सत्पुरुषाच्या पुढील कार्याला पोषक अशीच होती. अशा या पूर्वजन्मी पूर्ण सिद्ध पुरुष असलेल्या गृहस्थाला घरच्या मंडळींनी अजाणतेपणी संसारात गुंतविण्याचा प्रयत्न केल्यानं त्याला संसाराबाहेर काढण्यासाठी साईंनी तो त्यांच्याकडे पोहोचण्यापूर्वीच संसाराच्या आकर्षणातून बाहेर काढण्याचे सर्वथैव प्रयत्न करून त्याला शेवटी आपल्याकडे खेचलेच. हेतु हाच की त्याला पुन्हा एकदा जगाच्या कल्याणासाठी पूर्वजन्मीचा सिद्धावस्थेचा वारसा त्यांना अर्पण करायचा होता. यासाठी उपासनीना शारीरिक मानसिक, आर्थिक, कौटुंबिक, अशा अनेक समस्याना तोंड द्यायला लावून पूर्ण शरणांगतीनं साईंनी त्यांना आपल्याकडे ओढून घेतले. अर्थात उपासनींच्या जीवनावर इतका जबरदस्त प्रभाव पाडण्या इतपत स्वतः साई किती सामर्थ्यवान असतील याची कल्पनाच केलेली बरी! दुसऱ्यांच्या जीवनावर अशी अदृश्य

सत्ता गाजविण्याचं सामर्थ्य केवळ साईसारख्या अवतारी पुरुषाकडेच असते. म्हणून साई केवळ सत्पुरुष असून साक्षात अवतार होते असं मी ठामपणे म्हणतो. त्यांच्या जीवनातील अद्वितीय चमत्कार, त्यांची निसर्गावरील सत्ता, त्यांचं भक्तांच्या जीवनाचं नियंत्रण त्यांचं असामान्य अंतर्ज्ञान, एकाच वेळी अनेक भक्तांच्या कल्याणाकडे अचूक लक्ष आणि त्यासाठी योजलेले उपाय शिरडीत राहून त्याच वेळी दूरच्या भक्तांना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दर्शन, त्यांच्या विचारांचं नकळत केलेलं मार्गदर्शन, स्वतः समाधिस्त होऊन साठ वर्षे उलटल्यानंतर आजही त्यांची आठवण करणाऱ्या आणि न करणाऱ्याही सत्प्रवृत्तींच्या माणसांवर कनवाळुपणानं केलेलं कृपेचं सिंचन—ही सर्व पूर्णावताराची लक्षणं नाहीत तर काय ? तर मग अशा योगपुरुष साईंची उपासनींची शिष्य म्हणून केलेली निवड चुकीची कशी असेल ?

आता उपासनी हेच साईंचे शिष्य कसे हे स्पष्ट दर्शविणारे काही प्रसंग आता आपण पाहू या. सर्व प्रथम प्रसिद्ध साईभक्त रावसाहेब ह. वि. साठे यांनी सर्वांच्या समोरच "तुमचा खरा शिष्य कोण ?" असा प्रश्न सर्वांच्या समोर उपस्थित केला. थोडक्यात त्याचा अर्थ तुमचं सर्वस्व तुम्ही कोणाला देणार असाच होता. साईंनी त्यांच्या नामवंत भक्तापैकी कोणाचंच नाव घेतलं नाही. ते म्हणाले, "अरे, तो इथ यायचाय ! तो असेल लक्तरात ! आयुष्यातून उठलेला !" यावेळी उपासनी साईंच्याकडे येऊन पोहोचलेले नव्हते. नंतर काही दिवसानंतर ते शिरडीला आले ते खरोखरच लक्तरावस्थेतच–म्हणजे जीवनात गांजलेले, गांगरलेले, गलीतधैर्य झालेले असे होते. या शिवाय दारिद्र्यापायी त्यांचे कपडे फाटलेले, म्हणजे शब्दशः ते लक्तरातच होते. पण धड राहिलं होतं त्यांचं उच्च संस्कारांचं वस्त्र आणि आत्मज्ञानी मन—घराण्याच्या आणि पूर्वजन्माच्या संस्कारांच्या कवचानं सुरक्षित राहिलेलं ! असे हे काशीनाथ गोविंद उपासनी साईंच्या शिष्यत्वाला सुयोग्यच होते यात वाद नाही. उपासनींची ही पूर्व जन्माची आणि कदाचित् तत्पूर्वीची ही अनेक जन्माची योग्यता साईंच्या इतर भक्तांना माहीत नसल्यानं साईंनी त्यांना आपलं शिष्यत्व बहाल करावं हे इतरांना रूचलं नसावं. शिवाय त्यात असूयेचाही भाग असण्याचा संभव असल्यानं साई-जीवन गाथेत उपासनींचा साईंचे शिष्य म्हणून निर्देश झाला नसावा.

या नंतर उपासनींच्या बद्दलचे साईंचे वर वर गूढ वाटणारे पण स्पष्ट सूचक उद्‌गार आपण लक्षात घेऊ. एकदा भर सभेत "माझं सर्वस्व मी त्याला देणार आहे." असं बाबा उपासनींच्याबद्दल म्हणाले. त्यावर मुंबईच्या एका गृहस्थाने वादही घातला. म्हणाला, "बाबा आम्ही इतकी तुमची सेवा केली ती व्यर्थच गेली तर ? हा आत्ताच आला, त्यानं तुमची भक्ति आणि सेवाही केली नाही आणि तुम्ही त्याला सर्वच देऊन टाकलत ! "तेव्हा बाबा म्हणाले "अरे तो एकीकडे आणि तुम्ही सर्व एकीकडे" म्हणजेच उपासनींची लायकी त्यांच्या या सर्व भक्त

मंडळीपेक्षा वेगळी होती असंच बाबांनी सूचित केलं. हा वाद इथंच थांबला नाही. सदरहू गृहस्थ पुढं म्हणाले, "म्हणजे, बाबा तुम्ही त्यांना ताम्रपटावरच सनद लिहून दिली तर!" यावर बाबा एकदम उसळून म्हणाले, "ताम्रपटावर का? चांगली सोन्याच्या पत्र्यावर म्हण! तांब्यावर जंग चढतो. सोनं स्वच्छ राहतं! सोन्यासारखी त्याची लायकी आहे!"

या बाबांच्या उद्गारातील 'सोनं स्वच्छ राहतं!' हे शब्द अत्यंत सूचक होते हे कोणीच लक्षात घेतलेलं दिसत नाही. नाहीतर उपासनींच्या सत्पुरुषावस्थेतील जीवनावर बदनामीचे शिंतोडे उडविण्याचा प्रयत्न कोणीही सूज्ञ माणसानी केंव्हाच केला नसता. अर्थात तसल्या अग्निदिव्यातूनही हे सोनं सुलाखून निघून बावन कशीच ठरलं आहे! याही बाबतीत त्रिकालज्ञ साईंच्या तोंडून चुकीचं विधान केंव्हाच गेलेलं नाही हे सर्वच भक्तांच्या अनुभवावरून सिद्ध झालेलं आहे.

आता "माझं सर्वस्व मी यालाच देणार!' हे शब्दही रहा. बाबांचं सर्वस्व म्हणजे मालमत्ता किंवा संपत्ति नव्हे. बाबांची मशीद जुनी, पडकी आणि फार तर थोडी डागडुजी करून दुरुस्त केलेली होती. तिची काय किंमत? ही मालमत्ता उपासनींना मिळून काय फायदा होता? बरं बाबांचा पैसा? दक्षिणेच्या रूपानं बाबांच्याकडे अमाप पैसा यायचा ही गोष्ट खरी असली तरी रात्र होईपर्यंत अनेक गोरगरीबांना, सेवा करणाऱ्याना, बाबांच्यावर अवलंबून राहणाऱ्याना तो पूर्णतः वाटला जाई. ब्रिटीश सरकारच्या त्या वेळच्या गव्हर्नरपेक्षाही अधिक पैसा मिळविणारा मशिदीतला हा फकीर निष्कांचन होऊनच झोपायचा! तेव्हा तोही पैसा उपासनींना मिळण्याचाप्रश्नच नव्हता. तर मग बाबांनी उपासनींना देऊ केलेलं 'सर्वस्व' म्हणजे काय? अर्थात् त्यांचा अध्यात्मिक वारसा! म्हणजेच हा वारसा देऊ करून बाबानी उपासनींना शिष्यच नाही का मानलं? आणि हे शिष्यत्त्व उपासनींना काहीही न करता मिळणार होतं! त्यासाठी ते पात्र असलेच पाहिजेत हे निश्चितच. यावरून हेच सिद्ध होतं की शिष्य हा सतत आपल्या गुरुजवळ राहून, त्याची सेवा करून, त्याचा शब्द झेलण्यासाठी तत्पर असावाच लागतो, तोच आपल्या गुरूच्या पश्चात् गादीवर येतो, त्याचा मठ वा आश्रम चालवितो या आपल्या रूढ कल्पनांना बाबांच्या या 'सर्वस्व' देण्याचे शब्द धक्काच देतात. तेव्हा शिष्य या शब्दाचा अर्थ सामान्य पातळीवरून न घेता अध्यात्मात असलेल्या वरच्या पातळीवरूनच घ्यायला हवा. आणि तो तसा घेतला म्हणजे उपासनी हेच बाबांचे शिष्य होते ही गोष्ट मान्य करावीच लागेल.

तसं पाहिलं तर हे शिष्यत्त्व मिळविण्यासाठी उपासनी बाबांच्याकडे आलेही नव्हते, आणि त्यासाठी त्यांनी काही प्रयत्नही केले नव्हते. त्यांच्या पुढील कार्यासाठी

साईनाच त्यांची आवश्यकता वाटून त्यांनी त्यांना सत्पुरुषत्व आणि सद्गुरु-अवस्था बहाल करण्यासाठीच शिरडीत रोखून ठेवलं आणि ती स्थिति प्राप्त करून देण्यासाठी त्यांच्यावर अनेक अज्ञात प्रयोगही सुरू केले. गावाबाहेरच्या खंडोबाच्या देवळाच्या एकांत स्थळी त्यांना एकटंच बसवून मशिदीतून हे प्रयोग सुरू झाले. स्वतः उपासनींना घरी परतण्याची तीव्र इच्छा असूनही आणि माधवराव देशपांड्याकडून त्यांनी अनेकवार परवानगी मिळविण्याचा प्रयत्न करूनही, "अरे, त्याचा हिशेब अजून पूरा व्हायचा आहे! तो झाल्यावर त्याला विठोबा पावणार!' असं बाबांनी निक्षून म्हणावं आणि उपासनींना घरी जाण्यापासून परावृत्त करावं असं चालू होतं. शेवटी घरी परतण्याबाबत उपासनी पूर्णपणे निराश झाल्यावर बाबांचे त्यांच्यावरील शिष्यत्वाचे खरे प्रयोग सुरू झाले. पुढील तीन वर्षे उपासनींना सर्वांपासून वेगळं ठेऊन, दिव्यत्वाचा साक्षात्कार आणि त्याबरोबरच आसक्तीचा आणि अहंकारांचा आत्यंतिक तिटकारा त्यांच्या मनात उत्पन्न करून, त्यांचं जेवण-खाणंही बंद करून साईनी त्यांना भ्रमिष्ठावस्थेपर्यंत नेऊन पोहोचविलं आणि अत्यंत हीन दीन अपमानीत करून शेवटी त्यांना सर्व सामान्य मानवी भावनांच्या बाहेर आणून पूर्ण सत्पुरुषावस्था प्राप्त करून दिली. इतकच नव्हे तर या सर्वांचा कळस म्हणून शिरडीतच आपल्याच काही भक्तांकडून एका गुरूपौर्णिमेला उपासनींची त्यांच्या मनाविरुद्ध गुरू पूजाही करायला लागली. शिष्य घडविण्याचं साईचं कार्य पूरं होऊन श्री उपासनी हे समर्थ सद्गुरू अवस्थेला पोहोचले. या तीन वर्षांत साईनी उपासनींच आपल्याशी इतकं तादात्म्य घडवून घेतलं की त्यांच्यातील काही सिद्धी आणि अन्तर्ज्ञानही उपासनींना सहजगत्या प्राप्त झालं!

या सन्मानानं उपासनी हुरळून गेले नाहीत, तर उलट आपल्या गुरूविषयी आदर दर्शविण्यासाठीच त्यांच्याच स्थानात आपली सद्गुरू म्हणून होणारी पूजा टाळण्यासाठी एका शांत रात्री आपले चाहते आणि साईंचे निकटवर्ती भक्त डॉक्टर पिल्ले यांच्या समवेत कोणालाच न सांगता त्यांनी साईंच्याच पुढील कार्यासाठी शिरडीहून प्रयाण केले. जाताना साईंना सुद्धा सांगण्याची आवश्यकता त्यांना वाटली नाही. कारण गुरू आणि शिष्य यांच्यात आता द्वैतभाव राहिला नसून दोघांचे आत्मे दोघांची मने, दोघांचे विचार एक जीव आणि एक रूप होऊन दोघानाही एकमेकांचे भाव, विचार एकमेकाना न सांगताही समजू लागले होते. साई आणि उपासनी आता एकच होते.

उपासनींच्या या गुपचूप गमनान सर्वांचा जरी गैरसमज झाला तरी साईंच्या कृपेचा अवश्य हात आपल्या या पूर्णरूप शिष्याच्या पाठीवर सदैव फिरतच राहिला आणि त्यांचा आशीर्वाद त्यांनाच नव्हे तर त्यांच्या कार्यालाही कायमचा लाभून

साकुरी येथील श्री उपासनी कन्याकुमारी आश्रमाचं कार्य अखंड नंदादिपाच्या तेजानं तळपत राहिलं आहे.

त्याचीच साक्ष म्हणजे या आश्रमात पाऊल ठेवल्यावर इथल्या दिव्यत्वानं भारावलेल्या वातावरणानं प्रसन्न होणारं मन, विचार आणि आचार! साईंच्या साक्षात्काराचं प्रतिक–म्हणजेच श्री उपासनी कन्याकुमारी स्थान!

★ १०० वा (शतक महोत्सवी) प्रयोग ★

रविवार दि. १३ एप्रिल ८० सकाळी १० वा.

(अक्कलकोट स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त)

## रविन्द्र नाट्य मंदिर, प्रभादेवी (मुंबई)

"श्री साईबाबा संस्थान शिरडी" च्या सौजन्याने



श्री साईबाबांचे
तेजस्वी जीवन रंगभूमीवर
कुमारसेन गुप्ते
साईभक्तांसह सादर करीत आहेत
"आरती थिएटर्स" (मुंबई) निर्मित

**शिरडीचे श्री साईबाबा**

लेखक/दिग्दर्शक: किरण दुधाळकर • नेपथ्य: दत्ता चोडणकर
• निर्माता/संगीत: कुमारसेन गुप्ते

४० कलाकारांसह साईबाबांच्या भूमिकेत—किरणकुमार

प्रयोग क्र. १०१ सोम. दि. १४ एप्रिल दु. ४ वा.
शिवाजी मंदीर, दादर.


संपर्क :—कुमारसेन गुप्ते,
१४ पितांबर लेन माहीम मुंबई १६
फोन ४५६५४१

## श्री. डी. के. जाधव मास्तर यांनी तयार केलेला
## भव्य श्रीसाई मयुर रथ

मुंबापुरीतील प्रख्यात कलाकार व साई भक्त श्री. डी.के. जाधव मास्तर यांनी श्रीसाईबाबांच्या ६१ व्या पुण्यतिथी निमित्य एक भव्य मयुर रथ तयार केला असून तो अर्धा अधिक आरशांनी मढविलेला सजविलेला आहे. हा प्रेक्षणीय रथ श्रीसाई भक्तांना पहाण्यासाठी म्हणून गुढी पाडवा ते हनुमान जयंती पर्यंत त्यांच्या ३१ 'गुरुप्रसाद,' कलानगर गृहनिर्माण भवना समोर वांद्रे (पूर्व) मुंबई येथे ठेवला होता. या भव्य रथाचा उद्घाटन सोहळा प. पू. श्री. अण्णासाहेब पट्टेकर महाराजांचे शुभहस्ते पार पडला. मयुर रथाला सहा मोर असून रथात श्रीबाबांची अप्रतिम चित्रकलाकृती आहे. रथाला दोन अप्रतीम घोडे जोडलेले असून रथाचे सारथ्य करणाराही आहे. रथात योग साधनेच्या ९ पायऱ्या असून ६१ वी निमित्य ६१ पणत्या ठेवण्यासाठी ६१ बिलोरी कोनाडे आहेत वर झुंबरे पण ठेवलेली आहे. हा भव्य मयुर रथ पहाण्यासाठी भक्तांनी अतोनात गर्दी केली होती.



प. पू. श्री. पट्टेकर महाराजांचे आभार मानताना श्री. जाधव मास्तर मागे साटम महाराजांचे चरित्रकार श्री. र. ग. वायंगणकर



श्री. जाधव मास्तरांनी तयार केलेला श्री. बाबांचा भव्य प्रेक्षणीय मयूर; रथ

# बाबा ! बाबा ! मला पक्षी व्हावसं वाटतं हो ! ! !

—सौ. शशिकला रेवणकर

कुंटोली. अंबरनाथ

● "बाबा मला पुढचा जन्म खरंच पक्षाचा द्या हो" अशी पदोपदी बाबांची प्रार्थना मला करावीशी वाटते.

जर पक्षी झाले तर ना मग मी माझे खुपच भाग्य समजेन.! कारण मग मी कोणाच्याही बंधनात राहणार नाही. मला वाटेल तेव्हा, वाटेल तेवढा वेळ शिर्डीत बाबांच्या सान्निध्यात राहण्याचा चान्स मिळेल. ना गाडीची गरज ना पैशाची जरूरी, सर्व काही मोफतच ! नाहीतर हा मानव जन्म. त्यातल्या त्यात स्त्रीजन्म पूर्णच परावलंबी, स्वताचं असं काहीच चालत नाही. तेव्हा घरातील लोकांच्या मनात येईल तेव्हाच आमची इच्छा पूर्ण होणार तोपर्यंत कितीही आकांत केला तरी व्यर्थच.

मला शिर्डीत जायचे म्हणजे "जणू स्वर्ग दोन बोटं" असल्याचा भास होतो. अन् तेथून परतायचं म्हणजे असं वाटतं की कोणीतरी आपला प्राण तोडून नेताहेत, व पोलिस जसे गुन्हेगाराला हातकड्या घालून खेचून नेतात, तसेच घरातील मग कोणीही प्रिय व्यक्ती असो, मला शिर्डीतून घरी नेणारी ती त्या पोलीसांच्या ठिकाणी भासू लागते. अन् तेव्हा गुन्हेगाराला जसे वाटते तसेच मलाही वाटते. ह्या सर्वांच्या नजरा चूकवून कोठेतरी पळून जावे अन लपून बसावे, व ती लोकं जातील तेव्हा बाबांच्या पायाशी येऊन घट्ट पायाला कवटाळून बसावे. पण हे सर्व अशक्य आहे. कारण आम्ही इन्सान् शिवाय स्त्रिया आहोत. स्त्रियांचा जन्म म्हणजेच प्रत्यक्ष जन्मदाते असले तरी कन्यादानानंतर ती पूर्णपणे दुसऱ्यांच्या स्वाधीन म्हणून बाबांना म्हणते, बाबा, मला हा मानव जन्म बस झाला. पण पुढील जन्मी मला पक्ष्याच्या, विहंगाच्या जन्मात तुमच्याजवळ ठेवून घ्या. नसेल तर आम्हाला एवढे प्रेम लावलेच्च का ? तुमच्या प्रेमाने तुम्ही आम्हाला वेडं का बनवलं आहे. तुमच्या प्रेमाने मी अक्षरशः वेडी झाली आहे. जगात मला साईनाथ व साईमुख याशिवाय काहीच्च दिसत नाही. नित्याचे काही व्यवहार सुद्धा नको वाटतात. तहान भूक सगळी तुमच्यापुढे सर्व काही विसरून जातेय. असं वाटतंय कायम त्या शिर्डीच्या समाधी मंदिरातच्च बसून राहावं. तिथून हालूच नये पण हे सर्व मी पक्षी झाले तर शक्य होईल ना ? तेव्हा मला कोणाची भीती राहणार नाही. तहान भुकेची पर्वाही राहाणार नाही. तुमच्या भेटीस येणाऱ्या भक्तजनांचे मुक्तकंठाने स्वागत करता येईल. त्या समाधी मंदिरातील कोणत्यातरी कोपऱ्यात बसून तुमचे मधुर गीत गात तुम्हाला आळवित बसता येईल, व तुमच्याच प्रसादकणांवर माझी तहान भूक भागून जाईल. खरंच की नाही ? तुम्हीच सांगा ? नाहीतर आता बघा मुलांची शाळा, यजमानांचा काम-धंदा, असा माझा हा संसार ह्या भावसागरात मी वैतागून जाते, की वाटते नको हा संसार

आणि नको हा मानव जन्म त्यापेक्षा पक्षांचा जन्म बरा. ही दुनिया मायावी, क्षण-भंगूर, स्वार्थी आहे. पक्षी झाल्यानंतर मी कोठेही जरी असले तरी अन् तुमची आठवण आली की त्याचक्षणी ऊन, पाऊस, वारा यांची पर्वा न करता मी तुमच्या जवळ धावून, धावून आले असते. अन् तुम्हाला कडकडून भेटले असते. आता फक्त तुमच्या आठवणीने डोळयातून गंगा–यमुना वाहण्याव्यतिरिक्त काहीच होवू शकत नाही. तरी बाबा माझी वेडीची पुढील जन्माची ही इच्छा लौकरच पुरी करा व तुमच्या शिर्डीतच बांधून ठेवा. म्हणजे कोणीही दुष्ट तुमच्यापासून मला खेचून नेणार नाही. कराल ना बाबा माझी ही इच्छा पुरी ?

पक्षी होताक्षणी घेईन मी उंच भरारी।
अन् जाईन मी क्षणात शिर्डीच्या सुवर्ण कळसावरी ॥

* * *

# आधुनिक संजीवनी-उदी

–श्री. व्यंकटराव कृष्णाजीराव मुळे
' व्यंकटेश प्रसाद ' पहिला मजला खो. क्र. १६
एन्. सी. केळकर रोड, दादर मुंबई २८.

जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव

● श्रीसद्‌गुरू साईनाथांनी हा वरील दिलेला आदेश आपण भक्तांनी जर आचरणात आणला, तर खरोखर त्यांना वेळोवेळी श्रीबाबांची मदत होऊन भक्तांची संकटे दूर होतात, व त्यांच्या जीवनात सुख, समाधान, शांती निर्माण होते.

माझ्यावर असाच एक प्रसंग अलिकडे आला होता. माझ्या पाठीच्या मणक्यावर मधोमध एक आवळ्या एवढे गळू झाले. त्यामुळे मला सरळ झोपावयास येईना. माझे वयही वार्धक्याकडे झुकलेले त्यामुळे मला त्याचा त्रासही जास्त जाणवत होता. घरातील मुले मला डॉक्टराकडे दाखवून उपचार करू या असे सांगत होती. मागे माझ्या मोठ्या मुलाला असेच एक गळू झाल्यावर डॉक्टरांनी त्याचे लहानसे ऑपरेशन करून त्याला बरे केले होते. पण माझ्या वयोमानाला तो त्रास सहन होणार नाही. म्हणून मी माझ्या डॉक्टर श्री साईनाथांना मनामधून आळवून त्यांची उदी रोज पाण्यातून कालवून त्याचा लेप माझ्या मुलांच्या हातून गळूवर लावून घेऊ लागलो, आणि हळूहळू सूज व त्या गळूवरची लाली कमी होऊन शेवटी थोडेसे पू व रक्त निघाले व उदीनेच ते गळू पूर्ण पणे नाहीसे झाले.

श्रीसाईनाथांवर पूर्णपणे भार टाकून श्रद्धेने त्यांच्या उदीचा आपण उपयोग केला तर ती संजीवनी समान फलदायी होते. श्रीसद्‌गुरू दयाळू साई माऊलीच्या चरणी माझे कोटी कोटी प्रणाम.

# श्री साईकृपेचे दोन अलौकिक अनुभव....

—श्री. मधुकर सी. मंडलीक
टेलिफोन ऑपरेटर, सराफगल्ली, नवापूर
मु. पो. ता. नवापूर जि. धुळे

● पंचमहाभुतांनी घडविलेल्या मानवी देहाचा सत्पुरुषांनी जरी त्याग केला तरी त्यांच्या अस्तित्वाची प्रचिती ते आपल्या भक्तांना वेळोवेळी देत असतात; अशाच प्रकारे श्री साईबाबांचे अलौकिक अनुभव आमच्या कुटुंबास अनुभवावयास मिळालेत. मी स्वतः, माझी पत्नी व मुले आम्ही सर्वजण बाबांचे निस्सिम भक्त आहोत आमची बाबांवर पूर्ण श्रद्धा आहे. ही श्रद्धा अनुभवाने दृढ झाल्यावर दर-रोज पूजा, आरती, भजन, प्रार्थना वगैरे आम्ही करीत असतो. कुठल्याही संकटाच्या प्रसंगी बाबा आमच्यासाठी धावून येतात. बाबांचे वचनच आहे की.

" Why should you fear when I am here ? cast all your burdens on me and I will bear them. "

माझा मोठा मुलगा चि. दिपक हा दहा वर्षाचा असून सहाव्या इयत्तेत शिकत आहे. जन्मापासूनच त्याच्या बोलण्यात एक प्रकारचा दोष होता. तो जेव्हा बोलायचा त्यावेळी त्याचे उच्चार ऐकणाऱ्यास समजत नसत. बरेचसे शब्द तो अडखळत बोलायचा साहजिकच शाळेतील मुले त्यांची टिंगल करायची. काही उद्दाम मुले तर जाणूनबुजून त्याचे सारखे बोलून त्याला चिडवायचीत काही उपहासात्मक हसायची. या सर्व कारणाने दिपक दुःखी व्हायचा. धड अभ्यासाकडेही त्याचे लक्ष लागायचे नाही किंबहुना मी शाळेत जाणार नाही. मला शाळा नकोय; मी आपला घरीच शिकणार असेही तो माझ्याजवळ कित्येकदा सांगायचा.

"'ठेवीले अनंते तैसेची रहावे ' या उक्तीप्रमाणे मी मनाची समजूत करायचो तरीही मन मात्र सतत दुःखी रहायचे. दिपकचे पुढील शिक्षण कसे होईल या चिंतेने झपाटून गेलो. ज्यांनी ज्यांनी जो जो सल्ला दिला त्या त्या प्रमाणे उपचार करण्यात तिळमात्र कसूर केली नाही. नामवंत डॉक्टरांनाही दाखविले परंतु सर्व ठिकाणाहून निराशा पदरी पडली. एखाद्या खोल डोहावर पावसाळी कृष्णमेघांची छाया पडल्यानंतर तो अधिकच खोल, अधिकच गहन, अधिकच काळा दिसावा तसेच या निराशेने मी अधिकच निराश व्हायचो. या निराशातून एक आशेचा किरण दिसला तो म्हणजे शिर्डीचे साईबाबा—आम्ही सहकुटुंब शिर्डीला जाऊन बाबांना साकडे घालायचे बाबा, तूच आता तारक आहेस. माझा मुलगा चांगला बोलेल असे करण्यास तूच शक्तीमान आहेस असे मनात येताच लागलीच शिर्डीला गेलो व बाबांना आर्तभावाने प्रार्थना करून मागणे घालून संकल्प केला.

जर मुलाचे बोलण्यात, उच्चारात फरक पडला तर एका वर्षात त्यास तुमच्या दरबारात दर्शनास आणीन." परतताना शिर्डीहून उदी घेतली व उदीचा प्रयोग करण्याचे ठरविले.

उदी म्हणजे साधी राख नव्हे तर बाबांनी आपल्या योगशक्तीने उत्पन्न केलेल्या धुनीतील ती विभूती होय. अर्थात बाबांची दिव्यशक्ती उदी आहे उदीने कित्येकांची दुःखे हरण केली आहेत व कित्येकांचे रोगही बरे केले आहेत कित्येकांची चिंता सुद्धा दूर केली आहे.

घरी आल्यावर नियमितपणे काही दिवस दिपकच्या जीभेवर थोडी थोडी उदी देत गेलो, आणि खरोखरच उदीचा प्रभाव दिसून आला. त्याचे बोलणे पुष्कळ चांगले झालेले आढळून आले. आता तर तो तुमच्या माझ्यासारखे स्पष्ट बोलू लागलाय. चार चौघात मिसळू लागलाय. आपण तोतरे बोलायचो हा न्यूनगंड केव्हाच दूर झालाय. खरोखरच हे सर्व चांगले कोणी केले असेल तर ते म्हणजे बाबांनीच असा माझा ठाम विश्वास आहे. संकल्पाप्रमाणे दिपकला शिर्डीला नेले. योगायोगाने त्याचवेळी पंचमलेखक–कवि संमेलनही होते. संमेलनास उपस्थित राहण्याचा आनंद मिळाला. अनेक थोरामोठ्यांचा सहवास लाभला साईलीलेचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर, डॉ. सौ. सुमतीताई खानविलकर कविवर्य नागेश मोगलाईकर, जगदीश देवपूरकर आदी अनेक सहृदयांच्या भेटी झाल्या.

बाबांच्या दरबारात दिपकला दर्शनास नेले अभिषेक, पूजा, आरतीचा लाभ मिळाला समाधी मंदीरातील बाबांची मूर्ती पाहून डोळयातून नकळत आनंदाश्रू वाहू लागले आणि त्याचवेळी बाबांचे वचन आठवले.

"जो जो मज भजे, जैसा जैसा भावे
तैसा तैसा पावे, मी ही त्यासी ।

मला स्वतःला वाटतं की, श्री साईबाबा ही संकट निवारणारी एक अद्भुत शक्ती आहे. परंतु बाबांची भक्ती मनापासून हवी. अंतःकरणापासून हवी. पोटातुन हवी. हृदयातुन हवी, ओठातुन नको. श्री बाबा हे प्रेमळ व निर्भेळ भक्तीचे भूकेले आहेत. मनापासून केलेल्या भक्तीचा परिणाम त्वरीत दिसून येतो याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे आमचा दिपक. साईभक्त दिपकला चांगली वाचा देणाऱ्या अवतारी व अंतर्ज्ञानी महाश्रेष्ठ श्री सद्‌गुरु बाबांना त्रिवार वंदन !

माझा साई दयासिंधु
दीन अनाथांचा बंधु
संकटात घेई धाव
त्याचे चरण धरिता

या ओळी प्रमाणे श्री साईबाबा दयाळू असून त्यांना शरण जाणाऱ्यांना संकट-मुक्त करतात हे निश्चित. माझी मुलगी चिं. रेखा हीसुद्धा साईभक्त असून तिची बाबांवर नितांत श्रद्धा आहे. तिची श्रद्धा दिवसेंदिवस वाढतच आहे याला कारण म्हणजे सुमारे सात आठ महिन्यापूर्वी तिच्या दोघा ओठांना एकाएकी काळसरपणा आला. ते दिसायला फारच ओंगळ वाटायचे. त्यात स्त्री जीवन म्हटले म्हणजे सौंदर्यास फार महत्व. सौंदर्य म्हटले की सर्व अवयव अगदी रेखीव असावे लागतात. चेहरा, डोळे, ओठ यावरच शोभा असते. इतकं असुनही शेवटी परक्याचे धन. यावरच समाजात बरेवाईट नाव ठेवतात. मला रात्रंदिवस काळजी वाटायची.

मुलगी वाढते जशी चंद्रम्याची कोर<br>
बापाला पडे घोर, अंतरंगी

जस-जसे रेखाचे वय वाढले तसतशी चिंता वाढत जाणारी होती. त्यासाठी डॉक्टरी इलाज केलेत. पुष्कळ औषधोपचार केला. परंतु काहीच फरक पडला नाही. शेवटी पुन्हा बाबांचा धावा करून साकडे घालायचे ठरविले. व बाबांची उदी ओठावर लावण्यास सुरूवात केली. प्रत्येकवेळी बाबांना आवर्जून प्रार्थना करायचो 'बाबा, रेखा ही तुमचीच लेक आहे. तिला पुढील आयुष्य सुखात जाण्यासाठी तिच्या कल्याणासाठी काळसर पडलेले ओठ पूर्ववत करणे तुमच्या हातात आहे." आणि दिवसातच फरक जाणवू लागला व आता तिचे ओठ पूर्ववत झाले आहेत.

तुमचा विश्वास बसो अगर न बसो परंतु बाबावरील श्रद्धेचे व कृपेचेच हे फळ आहे. असा माझा दृढ विश्वास आहे. अशाप्रकारे लहान-मोठे अनुभव आम्हास आल्याने आमच्या घरातील लहान मोठे सर्वच जण बाबांचे भक्त झाले आहोत.

# भेटी लागी जीवा लागली से आस

—श्री. पां. वा. भुतकर<br>
२३/१६७५ अभ्युदय नगर मुंबई ३३

●साईलीलेचा जानेवारी ८० चा अंक हातात पडला व माझा साईभक्त भाचा सुरेश सातपुते याने मला शिर्डीक्षेत्री फेब्रुवारी ९ व १० रोजी होणाऱ्या लेखक-कवी स्नेहसंमेलनाला येण्याविषयी आग्रह सुरू केला. स्नेहसंमेलनाला निमंत्रण येण्याकरीता लागणाऱ्या सर्व अटी आम्ही दोघानी पूर्ण केल्या होत्या. त्यानेच माझा व स्वतःचा असे दोन्ही फार्म पोस्टाने शिर्डी कार्यालयास पाठवून दिले.

रितसर आमंत्रण आले व माझा भाचा रिझर्वेशन करण्याकरीता घाई करू लागला पण मी त्याला सांगितले की तुझे रिझर्वेशन तू करून टाक. मला जमल्यास मी शुक्रवारी रात्रीच्या गाडीने निघेन.

वस्तुस्थिती अशी होती की शिरडीस जाण्यायेण्यास पुरेसे पैसे जवळ नसल्यामुळे त्याला मी तसे सांगितले. वास्तविक मी जर त्याला तसे सांगितले असते तर त्याने माझा जाण्यायेण्याचा खर्च आनंदाने केला असता पण त्याला ती गोष्ट सांगणे माझ्या जीवावर आले.

शेवटी "तुम्ही माझ्याकडे पहा मी तुमच्याकडे पाहीन" या बाबांच्या युक्तीवर भरवसा ठेऊन स्वस्थ बसलो. मनातल्या मनात विचार येत होता की जर साईंच्या मनात असेल तर ते मला कोणत्याहि प्रयत्नाने घेऊन जातीलच !

स्नेहसंमेलनाला दोन तीन दिवस उरले असतानाची ही गोष्ट ! त्या दिवशी मी सहजपणे कॉटनग्रीन स्टेशनाजवळ असणाऱ्या श्रीराम मंदिराकडे जात होतो. हे मंदीर साधारण एका बाजूला असून तूरळकच ये जा असते. मी जात असताना आजूबाजूला कोणीच नव्हते. काही क्षणात माझ्या कानावर अचानक पुढील शब्द आले.

"जरा डोळे उघडून चला" मी दचकून आजूबाजूला पाहिले पण तिथं कोणीही नव्हते. माझं लक्ष समोर जाताच एक गुलाबी रंगाचे कागदाचे पाकीट पडलेले दिसले.

ते पाकीट मी उचलून हातात घेतले तेव्हा त्या लिफाफ्यात ५० रु. ची नोट असल्याचे आढळले. या लिफाफ्याबरोबर दुसरा कसलाही कागद नव्हता किंवा त्या पाकीटाचा मालक शोधण्यासारखा कोणताही दुवा त्यात नव्हता. दुसऱ्याच क्षणी माझ्या मनात विचार आला की मी शिर्डीस यावे म्हणूनच तर बाबांनी ही किमया केली नसावी ना !

दुसरे दिवशी सकाळी माझ्या कार्यालयातून माझ्या भाच्याला मी दूरध्वनीवरून शुक्रवार ता. ८-२-८० रोजी रात्रीच्या गाडीने निघत असल्याचे कळविले.

शिर्डीतले स्नेहसंमेलन आनंदाने पार पडले. पण या आनंदावर सोनेरी मुकूट चढविला तो उन्मनी अवस्थेत असलेल्या परम साईभक्त श्री पोतेवाले बाबा यांनी ! त्यांनी मला कृपा आशीर्वाद दिला व सहसा कोणाशीही जास्त न बोलणारे हे बाबा मुद्दाम मला थांबवून एक तासभर उपदेश देत होते. हाच माझ्या आयुष्यातील 'सुवर्णक्षण' होता.

## श्री साईलीला

मे १९८० चा अंक खास उदी विशेषांक. कृपया या खास अंकासाठी भक्तांनी साहित्य अजिबात पाठवू नये.

# चिन्तन !

—श्री सुर्यकांत माधवराव गर्जे, पुणे

● चिंतन हा एक सखोल विषय आहे. तितकाच तो महत्त्वाचा पण आहे. एखाद्या गोष्टीवर विचार करीत राहणे हा मनुष्य स्वभाव-धर्म आहे. परंतु निव्वळ विचार करणे म्हणजे चिंतन होऊ शकत नाही. चिंतनात विचार गर्भित असते. किंबहुना एक सुसूत्र विचार हाच चिंतनाचा गाभा होऊ शकतो.

या संसारात नानाविध प्रकारचे अनेक विषय आहेत. चांगले विषय आहेत त्याच्या अनेक पटीने वाईट विषय पण आहेत. दुष्ट आणि वाईट विषयाला विचार करीत राहणे म्हणजे चिंतन नव्हे चांगल्या विषयांचे मनन हेच चिंतन होऊ शकतो.

दुष्ट विचारांना आपल्या मनात थारासुद्धा देऊ नये मग त्याच्यावर विचार करीत बसण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. दुष्ट विचारांनी एकदा का मनात पिंगा घालायला सुरूवात केली की, मन पोखरून निघालेच म्हणून समजा दुष्ट विचारांनी मनाचा ताबा घेतला की माणसाचा ऱ्हास होतो. जीवन अधोगतीला जाते. वाईट पदार्थांच्या सेवनाने जसे माणसाच्या शरीरावर विपरीत परिणाम होतात तसेच वाईट विषयांच्या चिंतनाने मानवी मनावर दुष्परिणाम होतो. ते जर्जर होते, दुःखी आणि कमजोर होत जाते आणि परिणामी जीवनाच्या नाशास कारणीभूत होते. मानसीक दौर्बल्याने माणूस वेडा-पिसा होतो. जीवनातून उठतो.

मन सुदृढ करावयाचे असेल, जीवनात रस निर्माण करावयाचा असेल, आनंद फुलवायचा असेल तर चांगल्या गोष्टींचे मनन-चिंतन करणे अगत्याचे आहे.

चिंतनाचे अनेक प्रकार संभवतात. शास्त्रीय आणि विज्ञान-क्षेत्रात मानवाने प्रचंड प्रगती साधली ती चिंतनाच्या द्वारेच रात्रं-दिवस चिंतन करून शास्त्रज्ञानी अनेक शोध लावून मानवी-जीवनात सुख-निर्मिती केली आहे.

सर्व चिंतनामध्ये भगवत्-चिंतन श्रेष्ठ होय आणि म्हणूनच ते थोडे अवघड पण आहे. कोणतीही अवघड किंवा कठीण गोष्ट साध्य करावयाची झाल्यास कष्ट हे घ्यावेच लागणार त्यासाठी साधना ही करावीच लागणार. मनाची निर्मळता आणि एकाग्रता ही परमेश्वर चिंतनासाठी अत्यावश्यक आहेत. चिंतनामुळे परमेश्वर प्राप्ति होऊ शकते असे म्हटल्यास अतिशयोक्ति न व्हावी. पूर्वीच्या काळी ऋषि-मुनी जंगलात, आश्रमात किंवा गुहेत एकांतवासात राहून तपश्चर्या करीत असत, परमेश्वराचे मनन करीत ध्यानस्थ बसत असत. हा सर्व परमेश्वर-चिंतनाचाच प्रकार होय.

एकनाथ महाराजांची गोष्ट. एकनाथ त्यावेळी एक लहान, कोवळं वयाचं पोर. परंतु या वयातच त्याला परमेश्वर दर्शनाची ओढ लागली होती. ध्यास लागला होता. जनार्दन स्वामींच्या सेवा-चाकरीत तो रममाण झाला होता. मंदीराच्या हिशोबाचं काम त्याच्याकडे सोपविण्यात आले होते. एकदा हिशोब तपासत असताना छोट्या एकनाथाला एक दिडकीचा हिशोब लागेना. एक दिडकी कमी भरत होती. ही चूक सापडावी म्हणून तो पुन्हा पुन्हा सर्व वह्या चाळत होता. अखंडपणे तीन दिवस त्याचे हे काम सातत्याने चालू होते. या काळात तो तहान-भूक पार विसरला होता. दिडकीचा शोध लागावा याचेच त्याला ध्यान लागले होते, वेड लागले होते. अखेर दिडकीचा शोध लागला तेव्हा त्याला ब्रह्मानंद झाला. हे सर्व जनार्दन स्वामींनी न्याहाळले होते. ते छोट्या एकनाथास म्हणाले—

" बाळ, एका दिडकीच्या शोधासाठी तू अहोरात्र झटत होतास. तहान—भूक-सुद्धा विसरलास अशीच मनाची एकाग्रता जर तू परमेश्वर प्राप्तीसाठी दाखविलीस तर निश्चितच तुला परमेश्वर भेटेल. "

एकनाथ महाराजांना परमेश्वराने दर्शन दिले त्यांच्या मनाची एकाग्रता आणि ईश्वर चिंतन याचीच ही फलश्रुति होय.

चिंतन म्हणजे परमेश्वराच्या लीलांचे अवगाहन त्याच्या लीलांचे शांत चित्ताने केलेले मनन चिंतनाचा दुसरा एक फायदा म्हणजे माणूस चिंतनाने अंर्तमूख बनतो. विश्वाचा शोध घेण्याचे सामर्थ्य त्याच्या ठायी निर्माण होते. मी कोण ? माझा जन्म कशासाठी ! आध्यात्म म्हणजे काय ? आध्यत्मिक जीवन म्हणजे काय ? इत्यादि गहन प्रश्नांची उकल होऊ शकते.

मानवी जीवन म्हणजे एक महान कोडे जीवनाचा जितका विचार करावा तितके ते अधिक गुंतागुंतीचे वाटू लागते. तसे परमेश्वर चिंतनाचे कधीही होत नाही. उलट परमेश्वर चिंतनाने आनंद प्राप्ती होते. वृत्ती उल्हसीत होतात. पर्यायाने जीवन सुकर होते. सुखी होते. जीवनाची क्लिष्टता कमी होते. दुःखाला हसत-मुखाने सामोरे जाण्याची शक्ति निर्माण होते.

श्री सद्‌गुरू साईनाथ महाराजांचे स्मरण करणे, चिंतन करणे म्हणजे प्रत्यक्ष अमृतपान होय. त्याची गोडी अवीट आहे. जितके अधिक चिंतन करावे तितकी त्यांची गोडी अधिक वाढतच जाते. हा अनुभव प्रत्येकाने घेऊन पहावा. त्याची प्रचीति आल्याशिवाय राहणार नाही. श्री साईबाबांच्या चिंतनाने चिंता हरते, भय दूर जाते, व्याधि लुप्त होतात. श्री बाबांचे चिंतन हे चंदन होय. त्याच्या सुगंधाने मनोवृत्ती प्रफुल्लित होतात, पुलकीत होतात. आनंद दाटतो तो सौख्याचा, प्रीतीचा, आपुलकीचा श्री बाबांचे चिंतन चिरंजीवी आहे. चिरकाली आहे चिदानंदी आहे.

# शिरडी-वृत्त माहे फेब्रुवारी सन १९८०

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी नेहमीप्रमाणेच होती. काही कलाकारानी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे :—

कीर्तन :- १) संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे एकादशी व महत्वाचे दिवशीं झाली.

२) सौ. कलावती चव्हाण दादर मुंबई यांचे कीर्तन झाले.

प्रवचन:-१) ह. भ. प. श्रीराम दि. परचुरे साईलीला कार्यकारी संपादक इंग्रजी-आवृत्ती मासिक मुंबई.

२) ह. भ. प. लक्ष्मण बुवा वाघचौरे, शिरडी.

वादन, गायन नृत्य वगैरे-१) श्री. अनंत सें. शिंदे, चेंबुर मुंबई.

२) कु. चंदन अ. शिंदे, मुंबई.

३) श्री. त्रिशूल भजनी मंडळ, येरवडा, पुणे.

४) श्री. दुर्गामाता भजनी मंडळ, कोल्हापूर. ५) ह. भ. प. विठ्ठलबाबा महाराज हैद्राबाद. ६) श्री. एकनाथराव चव्हाण, पुणे. ७) श्री. नवरंग रांजणे, पुणे. ८) सौ. शैलजा वैद्य, पुणे. ९) श्री. विठ्ठल क्षीरसागर, पुणे. १०) श्री. मोहनराव वैद्य, पुणे. ११) श्री. श्रीराम विष्णु सातर्डेकर, मुंबई. १२) श्रीमती इंदिरा सी. पेंडसे, बडोदा. १३) श्रीमती पुष्पा शिंत्रे, मुंबई. १४) श्री. चंद्रकांत माने, मुंबई १५) श्री. बाळकृष्ण रा. रेळे, मुंबई. १६) श्री. सदानंद ता. आंग्रे, मुंबई. १७) प्रगती अंध विद्यालय, बदलापूर. १८) ह. भ. प. विश्वनाथ ब. सहाणे, वैजापूर. १९) श्री. रविंद्र रा. रा. सुपेकर, देवास. २०) श्री. शरदचंद्र क्षीरसागर देवास. २१) श्री. राजेंद्र महेश्वरकर देवास. २२) श्री. प्रकाश खांडेकर देवास २३) श्री. ऐशीराम मोहनदास खार, मुंबई. २४) सौ. ज्योती मनुजा मुंबई. २५) श्री. हरी ॐशरण मुंबई.

श्रीसाईनाथ थिएटर्स कोल्हापूर. कलाकारांची नांवे.

१) हेमसुवर्णा मिरजकर २) मंगला बरेकेकर. ३) सौ. सुलक्षणा माळी. ४) कु. अरुणा वाक्रेकर. ५) मास्टर आबू वंटमुरीकर. ६) आण्णासाहेब पानरकर. ७) दिनकर इनामदार. ८) चंद्रकांत सरनाईक. ९) अशोक मुधोळकर. १०) शाम खत्री. ११) श्री. विश्वनाथ साळूंखे. १२) श्री. नारायण वायदंडे १३) दत्ता गायकवाड. १४) श्री. विश्वनाथ बापट. १५) श्री मारुती साष्टीकर.

श्रीसाईलीला मासिक लेखक, कवी स्नेहसंमेलन कलाकारांच्या नावाची यादी:–

१) ह. भ. श्रीराम दि. परचुरे, मुंबई. २) सौ. कलावती चव्हाण मुंबई. ३) श्री. प्रकाश कर्वे इंदौर. ४) सौ. कमलाताई सांडभोर पुणे. ५) श्री. रघुनाथ सांडभोर पुणे. ६) श्री. जगन्नाथ कुलकर्णी, पुणे. ७) डॉ. सौ. सुमतीताई खानविलकर, लोणावळा. ८) श्री. विजय द. हजारे, मुंबई. ९) डॉ. सौ. इंदुताई नाईक, लोणावळा. १०) कु. जयश्री र. पुजारी, पुणे. ११) श्री. डी. बी. जगत्पुरीया. शिरुड. १२) श्री. द. म. मोरे, पुणे. १३) श्री. साईनाथ खडके, मुंबई. १४) उज्वल वा. कुलकर्णी, नंदुरबार. १५) श्री. नागेश मोंगलाईकर धुळे. १६) श्रीमती लीलाताई गुजराथी शिरडी. १७) श्री. हसमुख ओं. पाटील, नवापूर. १८) सौ. शशिकला रेवणकर, अंबरनाथ. १९) सौ. लीलाताई डी. मराठे, धुळे. २०) श्री. रमेश डी. चव्हाण, नवापूर. २१) श्री. डी. बी. पोतनीस, पिंपरी. २२) श्री. जगदीश देवपूरकर, धुळे. २३) श्री. किशोर बा. जाधव चंद्रपूर. २४) श्री. नारायण गोखले डोंबीवली. २५) श्री. दौलतभाई शर्मा, मुंबई. २६) श्री. राधाकृष्ण गुप्ता, चेतन डोंबीवली. २७) श्री. बैजनाथ प्र. उपाध्याय भंडारा. २८) प्रा. गुंडेराव पटवारी, बिदर.

फेब्रु. ९, १०, तारखांना शिर्डी येथे श्रीसाईलीला मासिकाच्या लेखक कवींचे सहावे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले.

**हवापाणी:**—शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

**माननीयांच्या भेटी—**

१) मा. श्री. एस. प्रभाकरन, जिल्हाधिकारी, अहमदनगर.

२) मा. श्री. जी. व्ही. एस. मनियन, मुख्य कार्यकारी अधिकारी, विद्युतमहामंडळ महाराष्ट्र.

३) मा. श्री. शशिकांत पैठणकर, आय. ए. एस. जिल्हाधिकारी, वर्धा.

४) मा. श्री. आगिसान विरप्पा, लघोद्योग, तथा मत्स्योद्योग मंत्री आंध्रप्रदेश.

५) मा. श्री. जयचंद्रड्डू, उद्योग, संचालक, आंध्रप्रदेश.

६) मा. श्री. व्यंकटेश्वरराव सहसंचालक, सहसंचालक, मत्स्योद्योग आंध्रप्रदेश.

७) मा. श्री. ईश्वरराज माथूर, प्रसिद्धिसंचालक, महाराष्ट्र, मुंबई,

८) मा. श्री. डी. डी. साठे, आय.ए.एस. (निवृत्त), अध्यक्ष, प्रबंध संचालक, एक्सपोर्ट क्रेडिट अँड गॅरंटी कार्पोरेशन, महाराष्ट्र मुंबई.

९) मा. श्री. एन्. एन्. कामटे, निवृत्त भूतपूर्व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र.

१०) मा. श्री. पी. आर. षण्मुखानंद, उपसचिव, सहकार खाते, तामिळनाडू.

११) मा. श्री. पी. बी. सावंत, न्यायमूर्ति, उच्च न्यायालय, मुंबई.

१२) मा. श्री. व्ही. आर. कोमारी, उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा महाराष्ट्र
१३) मा. श्री. एच. एस. राणे, सहसचिव, समाज कल्याण खाते, महाराष्ट्र मुंबई.
१४) मा. श्री. जांबूवंतराव धोटे, खासदार, नागपूर.
१५) मा. श्री. एस. डी. पाटील, IAS, उपमुख्य कार्यकारी अधिकारी औद्योगिक विकासमहामंडळ, महाराष्ट्र, मुंबई.
१६) मा. श्री. मुर्शीद विसा,– बाबा कबीर आश्रम, कोलोन्याडो, अमेरिका.
१७) मा. श्रीमती चैतन्यप्रभा हेडॉन, अमेरिका.
१८) मा. श्रीमती रोझालीन, मॅक कॉय, अमेरिका.
१९) मा. श्रीमती रसेल रोल, अमेरिका.
२०) मा. श्री. चरणजितसिंग, सरसेनापती, संचालक, ऑ. नवी दिल्ली.
२१) मा. श्री. एन्. पी. भणगे, प्रांताधिकारी, संगमनेर.
२२) मा. श्री. दहाद, प्रबंध संचालक, MSFC, महाराष्ट्र, मुंबई.
२३) मा. श्री. वसंतराव चौधरी प्रसिद्धि उपसंचालक, पुणे.
२४) मा. श्री. अशोक बसाक, IAS, प्रबंध संचालक, टेस्कॉम, औरंगाबाद.
२५) मा. श्री. मदनलाल सचिव, कर्मचारी निवड समिती, दिल्ली.
२६) मा. श्री. ल्व्हाळे, IAS, अध्यक्ष, कर्मचारी निवड समिती, मुंबई.
२७) मा. श्री. बी. पी. दलाल, ICS, निवृत्त, भूतपूर्व विधी सचिव, मुंबई.
२८) मा. श्री. एस. वी. भोसले, IAS, पुरवठा अधिकारी, अहमदनगर.
२९) मा. श्री. मेहता सचिव, विद्युत महामंडळ, नवी दिल्ली. ,
३०) मा. श्री. शर्मा, ग्रामीण पुनर्निर्माण विभाग नवी दिल्ली.
३१) मा. श्री. गणपतराव देशमुख तत्कालिन, विधीन्याय, व कृषिमंत्री महाराष्ट्र मुंबई.
३२) मा. श्री. डी. आर. खडके निवृत्त, केंद्रीय गुप्तचर अधिकारी, सुवर्ण पदक विजेते, भारत सरकार मुंबई.
३३) मा. श्रीमंत अनूबाई घोरपडे ( इचलकरंजीकर ) भूतपूर्व श्रीमंत राणीसाहेब संस्थान इचलकरंजी
३४) मा. श्री. गोदावरीमाताजी, उपासनी कन्याकुमारी स्थान साकुरी.

## साईप्रभू

साई साई हे नाम घ्यावे
तोच एक आधार रे
कलीयुगातील एकच तारक
मंत्र मानवा जाण रे ॥ १ ॥
जीर्ण कफनी अंगावरती
चिलीम तमाखू घेई हाती
परि असे ती जागृत ज्योती
शिरडी ग्रामी रे ॥ २ ॥
स्वये असूनी परमेश्वर
भिक्षा मागे घरोघर
वाटे वेडा परि अंतरी
भरल्या नाना कळा रे ॥ ३ ॥
जीर्ण मशिदीत वास असे
क्षुधा-तृषा ही कधीच नसे
ब्रम्हांड गिळूनी बसला साई
भले जगाचे करण्या रे ॥ ४ ॥

—श्यामा शंकर पराडकर
पाध्ये वाडा १८९०, मारुती आळी, रत्नागिरी.

---

## ॥ श्रीसाईंशी प्रार्थना ॥

जय जय माझ्या देवा, श्रीसाईनाथा
जीणें हे व्यर्थ, आपुल्या कृपयाविणा ॥ १ ॥
मी तो नाही कोण, पण एक गरीब पामर
आपुलीच भक्तीसेवा करण्यास सदैव आतुर ॥ २ ॥
देऊ नका मनी, कधी दुष्ट वासना
जोडी माझे मना, सदैव आपुलीच चिंतना ॥ ३ ॥
ठेवितो डोई आपुले चरणा
जय जय माझ्या देवा, श्रीसाईनाथा ॥ ४ ॥

—श्री. अशोक केळकर
१२३४, सुभाषनगर, पुणे २

# माझ्या जीवनाची साथ–साईनाथ

माझ्या जीवनाची साथ एक साईनाथ
रात्रंदिन जीवा करी कृतार्थ ॥ १ ॥
तुझी शिकवण मज हेचि समाधान
मनीं चिंती ध्यान तुझें एक ॥ २ ॥
अपार दुःखें संसारी जीवनात
परि तरुनी जाय तुझ्या चिंतनात ॥ ३ ॥
हेंचि सुख अपार कोणा लागे जीवा
तोचि होय मुक्त तुम्ही जाणां ॥ ४ ॥

—डॉ. ग. स. कामत,
११९४/१३ शिवाजीनगर, पुणे ४११००५.

# साईनाम

साईनाम तुझे साईनाम
हे भक्तांचे सुखधाम ॥ धृ० ॥
रोग संकटे घोर आपत्ती
नसे कल्पना उभे ठाकती
नाम घेता येते प्रचीती,
भाव असावा ठाम ॥ १ ॥
सात समुद्रा दूर माऊली
नाम रूपाने देही राउळी
सदा कृपेची मिळे सांवली
भक्तीचे हे दाम ॥ २ ॥
नको दिप ते गंध सुगंधीत
श्रद्धा फुले ही करा समर्पित
मुखी असावे नाम स दोदित,
ॐ साई श्रीराम ॥ ३ ॥

—श्री. ग. रा. पालकर
२२३/२, दारूवाला चाळ,
बझार वॉर्ड, कुर्ला, मुं. ७०

# —: शिरडीच्या नाथा :—

शिरडीच्या साईनाथा
आलो तुझ्या दारी
दर्शनाची आस
उपजली अंतरी ॥ १ ॥

नाम तुझे थोर
महिमा तुझा थोर
म्हणूनच साई
आलो तव पायी ॥ २ ॥

पायी तुझ्या माथा
ठेविला मी आता
अनाथाच्या नाथा
पावन करा या भक्ता ॥ ३ ॥

शिरडीचे हे क्षेत्र
असे मंगल पवित्र
पहाताचि देवा
सुखावले नेत्र ॥ ४ ॥

तुझ्या चरणी मिठी
घालीतो जो नर
पापी असो वा चोर
होतो तयाचा उद्धार ॥ ५ ॥

मज या दासाला
घडो तुझी सेवा
शिरडीच्या नाथा वाटे
तूज अंतरी पूजावा ॥ ६ ॥

—श्री. दशरथ रामजी तळेकर
मुकेश मिल कंपाउन्ड
पी/६ कुलाबा, मुंबई–५

# ॥ साई पूजा ॥

माझी साई–पुजा देव पुजा ।
पाय तुझे साईनाथा । माझी ॥ धृ ॥

साई चरणाची उदी । तिच माझी भागीरथी ।
माझी साई–पुजा देव पुजा ॥ १ ॥

साई चरणाचा बिंदु । तोचि माझा क्षीर-सिंधु ।
माझी साई–पुजा देव पुजा ॥ २ ॥

साई चरणाचे ध्यान । तेचि माझे संध्या-स्नान ।
माझी साई–पुजा, देव पुजा ॥ ३ ॥

साई बाबा वाचुनि दैवत नाही ।
माझी साई पुजा–देव पुजा ॥ ४ ॥

—श्री. राम औसेकर,
भूमी अभिलेख विभाग, बीड.

* * *

# शिरडी माझे पंढरपूर

शिव–शंकर हा 'भोळा-साई' सर्वांतर्यामी निर्गुण असे ।
रमा–माधव हाच 'श्रीसाई' शिरडीमध्ये सगुण दिसे ।

डीवचू नका कधी 'साई-भावना' भावापाशी देव वसे ।
माधवाची तर अगाध लीला 'साईनाथ' स्तंभी प्रगट असे ।

झेप घेऊनी संकटकाली प्रेमापोटी 'साईमाऊली' धावतसे ।
पंडीत असो वा मूढ तयाची आर्त-प्रार्थना 'दत्त-साई' ऐकतसे

ढळू देऊ नका श्रद्धा सबुरी 'साईराम' ती जाणतसे ।
रघुपति–राघव 'साई-दिगंबर' त्रैलोक्याचा स्वामी असे ।

पूरवुनी साऱ्या भक्त कामना चराचरी 'नानक-साई' भरलासे ।
रक्षण करत्या 'अल्ला-साई' ला भक्ताचा साष्टांग प्रणिपात असे ।

—श्री. विलास तु. पडवळ
१७३/४ शिवनेरी, दादासाहेब फाळके मार्ग,
दादर मुंबई १४,

# माय माऊली ग साई

दुग्धाचिये वाटी ।
शर्करा मेळवी ।
तेणे मनी सुखी । झालेसे बाळ ॥ १ ॥
तैसे साईचिये द्वारी ।
भक्त जन येती ।
आप आपापले परी । सुखावती ॥ २ ॥
जन भोळे भाविक ।
त्यांस दर्शनाचे सुख ।
श्रीसाई प्रसवीत । दुग्धधारा ॥ ३ ॥
संसाराचे हतवटी ।
कष्टविला जगजेठी ।
रोष नसे मुखावरी । क्षीराब्धिच्या ॥ ४ ॥
माय माऊली ग साई ।
मज दुधाची ग घाई ।
उचलोनी कडिये घेई । पाजी दुध आता ॥ ५ ॥

—सौ. आशा दयानंद इंगळे
जलमंदिर सोसायटी, जे १३ ब्लॉ. नं. १
भांगुर नगर, गोरेगाव (पश्चिम) मुं. ६३

# ओम साई नमः

साई काय सांगू तुला वदोनी ॥ धृ० ॥
तुझी गोड येता स्मृति आसवांनी ॥
पहा नेत्र येतात दोन्ही भरोनी ।
तुझे प्रेम साई तुझी भक्ती साई ।
सदा रोमरोमांत राहो भरोनी ॥
तुझे गीत ओठी तुझे प्रेम पोटी ।
तुला हात जोडी जगी या नमोनी ॥

—कु. सुधा अर्जुन शिवलकर
मांडवी, भडंग नाका, रत्नागिरी

# ॥ शिर्डीश्वरा ॥

जय जय साईनाथ शिर्डीश्वरा
वंदन करितो जोडोनी करा ॥ धृ० ॥

शिर्डीग्रामी तू वसशी
निर्गुण असुनी मानसी
सगुणरुपी दर्शन देशी
पडलो संकटी, येई धावुनी दुःख माझे हरा ॥ १ ॥

तू जग चालक
होशी सुखदायक
आपला हा सेवक
हृदयमंदिरी स्थापुनी तुजला पूजितो मी खरा ॥ २ ॥

तुझे नाम तारक
साई साई करतो बालक
माझ्या जगन्नायक
दर्शन देऊनी कृतार्थ देह हा करा ॥ ३ ॥

कलियुगी या दीननाथ प्रकटला
दावुनी त्या अघटीत लीला
होई सुख मम लोचनाला
नम्र होऊनी वंदन करितो हे विश्वेश्वरा ॥ ४ ॥

—श्री. बबन धोंडू येरम
१।५, कल्याणजी देवजी चाळ,
चिरागनगर घाटकोपर मुं. ८६